

कुलगुरु कै. वि. गं. तथा
दादासाहेब केतकर



धनुर्धारी श्रीराम लक्ष्मण






शिक्षणमहर्षी कै. डॉ. ग. श्री.
तथा अण्णासाहेब खैर

पुणे विद्यार्थी गृहाचे मासिक

# समाचार

**Pune Vidyarthi Griha's 'Samachar' Magazine October 2024 - Pages - 44**

संपादक : श्री. राजेंद्र विठ्ठल बोऱ्हाडे    कार्यकारी संपादक : श्री. सुभाष मल्लाप्पा जिर्गे

✻ पुणे ✻ वर्ष ७५ ✻ अंक १२ ✻ किंमत रु. १०/- ✻ वार्षिक वर्गणी रु. १००/-



विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय घाटकोपर शाखा, मुंबई येथे दि. ५ सप्टेंबर २०२४ रोजी शिक्षकदिनी 'देव देश प्रतिष्ठान', 'छबी सहयोग फौंडेशन', 'आरोग्य भारती' यांच्या सहकार्याने सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी वृंदासाठी वैद्यकीय तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते. या प्रसंगी देव देश प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. वैभव देवगिरकर यांचा सत्कार करताना कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे, समवेत 'देव देश प्रतिष्ठान'चे उपाध्यक्ष श्री. शशिकांत देशपांडे, 'छबी सहयोग फौंडेशन'चे जनरल सेक्रेटरी श्री. पार्थो रॉय, डावीकडे पुणे विद्यार्थी गृहाचे सल्लागार आणि अंतर्गत हिशोब तपासणीस श्री. टी. आर. दौंडकर, आरोग्य भारती कोकण प्रांत उपाध्यक्ष श्री. निलेश सिंघानिया

## ※ विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, घाटकोपर शाखा, मुंबई ※



महाराष्ट्र राज्य शिक्षण संस्था महामंडळाचे कार्याध्यक्ष आणि माजी केंद्रीय मंत्री श्री. विजय नवल पाटील यांचा शाल आणि पुष्पगुच्छ देऊन सत्कार करताना कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे, समवेत महामुंबई शिक्षण संस्थेचे पदाधिकारी



गणेशोत्सवानिमित्त आमदार मा. श्री. राम कदम यांच्या विद्याभवन संकुलास सदिच्छा भेट प्रसंगी त्यांचे स्वागत करताना कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे आणि अनुसंधान समिती सदस्य प्राचार्य के. एन. शिरकांडे, समवेत श्री. बा. गो. कुलकर्णी (मा. वि.)



गणेशोत्सवानिमित्त आमदार मा. श्री. पराग शाह यांनी विद्याभवन संकुलास सदिच्छा भेट दिली. या प्रसंगी त्यांचे शाल व पुष्पगुच्छ देऊन स्वागत करताना कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे

## ※ विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, नेरुळ शाखा, नवी मुंबई ※



दि. २ सप्टेंबर २०२४ रोजी क्रीडा दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात वेगवेगळ्या स्पर्धांमध्ये अनेक विद्यार्थ्यांनी नैपुण्य मिळविल्याबद्दल प्रातिनिधिक स्वरूपात विद्यार्थ्यांचा गौरव म्हणून कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ यांना आमदार मा. श्री. गणेश नाईक यांच्या हस्ते सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. या प्रसंगी उपस्थित मुख्याध्यापिका श्रीमती सुवर्णा मिसाळ, श्रीमती श्रीजा नायर, मुख्याध्यापक श्री. गोरख कदम, समन्वयक श्री. पांडुरंग मुळीक, श्री. सुहास राऊळ, श्रीमती जयश्री तिपायले आणि उपस्थित मान्यवर

संपादकीय

# विजयादशमी

**प्रथमतः आपणा सर्वांना विजयादशमीच्या शुभेच्छा !**

अश्विन महिन्यात साधारणतः पावसाळा संपत येतो. त्यामुळे निसर्गाचा एक वेगळाच बहर आपल्याला अश्विनात जाणवतो. अश्विन लागला की, हादगा पानोपानी फुलून येतो. कारंजाच्या आकाराच्या आपल्या चिमुकल्या मुठी हे झाड खुले करीत जणू अश्विनाचे रहस्यच खुले करते. हात पसरून धरणीकडे धाव घेणाऱ्या सुफलतेचे रूपक म्हणजे हे हादग्याचे झाड. धनलक्ष्मीचा, अन्नपूर्णेचा हा पुष्पमय आविष्कार. येणाऱ्या उद्याच्या समृध्दीची चाहूल आपल्याला अश्विनात लागते. ही समृध्दी केवळ आर्थिकच नसते तर, आपल्या परंपरेतल्या सांस्कृतिक समृध्दीचेही प्रतिक आहे.

वरतंतू ऋषींचा शिष्य कौत्स, अतिशय गरीब पण अतिशय हुषार, वरतंतूंनीही मुक्तहस्ताने आपली विद्या कौत्साला दिली. विद्याभ्यास पूर्ण झाल्यावर तत्कालिन प्रथेप्रमाणे कौत्साने वरतंतूंकडे गुरूदक्षिणेबाबत विचारणा केली. कौत्साची आर्थिक परिस्थिती जाणत असल्याने, वरतंतूंनी कुठल्याही स्वरूपातील गुरूदक्षिणा घेण्यास नकार दिला. परंतु कौत्साने अति आग्रह केला तेव्हा, रागाच्या भरात ते म्हणाले, 'मी तुला १४ विद्या शिकवल्या तेव्हा प्रत्येक विद्येचा मोबदला म्हणून एक - एक कोट अशा १४ कोट सुवर्ण मुद्रा तू मला दे.'

गुरूदक्षिणा ऐकून कौत्स भांबावला. या कठीण परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी त्याने इक्ष्वाकू कुळातल्या रघू राजाकडे धाव घेतली. परंतु नुकत्याच केलेल्या यज्ञात राजाने आपला सर्व खजिना रिता केला आहे, हे कौत्साला त्याच्या स्वागतासाठी वापरण्यात आलेल्या मृत्तिका पात्रावरून लक्षात आले. तेव्हा एक शब्दही न बोलता कौत्स परतू लागला. पण, रघूराजाने केलेल्या आग्रहावरून त्याने राजाला गुरूदक्षिणेबाबत सांगितले. तेव्हा, दारी आलेला अतिथी विन्मुख जाऊ नये म्हणून राजाने धनदेव असलेल्या कुबेरावरच स्वारी करण्याची योजना आखली. राजाचे सामर्थ्य आणि स्वारी मागील त्याचा शुध्द हेतू जाणून राजाच्या उद्यानातील आपट्याच्या झाडाखाली धनवर्षाव करून कुबेराने राजाची गरज भागवली व स्वतःला संकटमुक्त करवले.

दसऱ्याच्याच दिवशी शुंभ - निशुंभ, रक्तबीज, महिषासुर आदी दैत्यांचा विनाश करून याच दिवशी जगदंबेने मानव जातीला नवजीवन दिले. कौरवांनी विराट राजाच्या गाई पळवल्या तेव्हा, त्यांचा प्रतिकार करण्यासाठी अज्ञातवास संपलेल्या अर्जुनाने शमीवृक्षाच्या ढोलीत ठेवलेली आपली शस्त्रे याच दिवशी पुन्हा हाती घेतली आणि कौरवांचा पराभव केला.

पुराणातल्या दसऱ्याच्या संदर्भातल्या या कथा जर आपण पाहिल्या तर, आपल्याला जाणवते की, अन्यायाचे निर्दलन, असत् शक्तिचा नाश आणि सत् वृत्तीचे संरक्षण व स्थापना या दिवशी साजरी केली गेली. याचेच प्रतिक म्हणून रावणाच्या पुतळ्याचेही दहन केले जाते.

आजही समाजात आपल्याला ठाई ठाई अज्ञान, दारिद्र्य आणि दुःखाचे जणू पेवच फुटलेले जाणवते. आपल्या बांधवांपैकी अनेकांच्या अन्न, वस्त्र, निवारा या मुलभूत गरजाही पूर्ण होताना दिसत नाहीत. अन्याय आणि रोगराईचे थैमान आपल्याला जागोजागी जाणवते.

विज्ञानाने कितीही प्रगती केली असली आणि त्यामुळे मानवी जीवन समृध्द होत असले तरी, आजही आपल्या समाजात अनेक वंचित आहेत.

दसऱ्याला सीमोल्लंघन करण्याची आपली जी परंपरा आहे ती परंपरा ध्यानात घेऊन या दसऱ्याच्या शुभदिनी आपण सर्वांनी मानव जातीच्या उद्याच्या सुखी आणि समृध्द जीवनाची पुर्नस्थापना करण्यास सीमोल्लंघन करुया ! आपण साऱ्यांनी एकजूट करत आपल्या संपूर्ण ताकदीनिशी समाजातील अज्ञान, दारिद्र्य, रोगराई, विषमतेविरुध्द लढा पुकारून

समाजात ज्ञान, सहिष्णुता आणि समतेची स्थापना करण्यास सीमोल्लंघन करुया ! जिथे द्वेषाचा विंझणवारा नसेल, जेथे 'बळी तो कान पिळी' हे तत्त्व नसेल तर 'जगा आणि जगू द्या' या मूलमंत्राने पछाडलेल्या व्यक्ती समतेचा ध्वज उंचावत 'जो जे वांछिल, तो ते लाहो ।' या भावनेने सत्य आणि न्यायाची कास धरीत संपूर्ण समाजाचे उन्नयन करतील, अशा उद्याच्या आर्थिक आणि वैचारिक समृध्द समाजाच्या पुर्नस्थापनेसाठी सीमोल्लंघन करूया । मानवतेचे मूल्य रुजवण्यासाठी आणि वाढविण्यासाठी सीमोल्लंघन करूया !

दीपावली पुढील महिन्यात आहे, परंतु आपला पुढील महिन्याचा अंक हा दीपावलीनंतर आपल्याला मिळेल म्हणून विजयादशमीच्या शुभेच्छांबरोबरच मी आपणा सर्वांना दीपावलीच्याही शुभेच्छा देत आहे.

ही दीपावली व आगामी वर्ष आपणा सर्वांना सुख, समृध्दी आणि भरभराटीचे तसेच आरोग्यदायी जावो ही मनःपूर्वक शुभेच्छा !

दि. २८ सप्टेंबर २०२४
इंदिरा एकादशी

## तीन पैशांत सोळा आणे काम

''बाळाचे अजून पत्र का आले नाही?'' वडील चिंता करीत असतात. ''बाबीनं काही अजून पत्र पाठवलं नाही!''- आई विवंचनेत असते. ''हे दौऱ्यावर जाऊन दहा दिवस झाले; पण अजून एकही कार्ड नाही!''- गृहलक्ष्मी विचार करीत असते. ''ही एकटीच माहेरी गेली; पण नीट पोचली की नाही? पत्रदेखील नाही!'' - गृहपती मनात कुढत असतात.

याच प्रकाराने मित्रमित्र, मैत्रिणी-मैत्रिणी, जवळचे नातेवाईक यांची उदाहरणे देता येतील. तीन पैशांचे कार्ड लिहून टाकले असते तर सर्वांची चिंता दूर झाली असती. परंतु पत्र लिहिणाराला आळस येतो. आणि इतर लोक निष्कारण विवंचनेत पडतात. सगळ्यांत चिंता ही आपल्या सुखाला अत्यंत हानिकारक आहे.

तीन पैशांचे कार्ड; पण त्याचे काम मात्र सोळा आणे मोलाचे आहे. पूर्वीच्या पिढीतील लोकांना ही सोय नव्हती. आज आपल्याला ती आहे; पण तिचे महत्त्व आकलन झालेले नाही.

बारा वाजले आहेत. कुटुंबाचे जेवणखाण, उष्टे-खरकटे करून मालकीणबाई वामकुक्षीकरिता आडव्या होणार-इतक्यात बाराच्या गाडीने सहकुटुंब पाहुणे येतात! अगदी अचानक! पुन्हा बंब पेटवून पाणी तापवा, भात करा, पिठले करा, पाहुण्यांना जेवावयास घाला! कसली विश्रांती अन् कसले काय? पाहुण्यांनी तीन पैशाचे पत्र टाकले असते तर सगळी तयारी ठेवता आली असती. उभयतांना सुख झाले असते. पण-पत्र पाठवावयाचा आळस. आपल्या आळसापायी आपण इतरांना किती त्रास देणार आहोत, याचा विचार नाही. आपल्या सुखाचा विचार, इतरांच्या सोयीचा विचार नाही.

तीन पैशाच्या पत्राने आपण इतरांना किती सुख देऊ शकतो, पाहा. चिंता कमी होते. कष्ट कमी पडतात. माहिती मिळू शकते. अनेक सोयी होतात. लिहावयाचा आळस करू नका. तुमचा आळस तितके इतरांना दुःख, हे लक्षात ठेवा.

**डॉ. ग. श्री. खैर (जानेवारी १९५७)**

# शुभ दीपावली

संस्थेचे सर्व देणगीदार, हितचिंतक,
पालक, आजी व माजी विद्यार्थी आणि
सर्व विभागांचे प्राचार्य, शिक्षक व सेवकवर्ग
यांना दीपावली व नूतनवर्ष
सुख, समृद्धी व भरभराटीचे
तसेच आरोग्यदायी जावो
ही हार्दिक शुभेच्छा!

## पुणे विद्यार्थी गृह

विश्वस्त संचालक मंडळ

# महाराष्ट्र विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, पुणे

**संचालक : डॉ. राजेंद्र सं. कांबळे**
**प्राचार्य : श्री. व्हि. पी. गावडे**

### शिक्षक दिन उत्साहास साजरा

गुरुवार दि. ५ सप्टेंबर २०२४ रोजी शिक्षकदिन उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी साहित्यिक आणि विचारवंत डॉ. मधुसूदन घाणेकर, प्राचार्य व्हि. पी. गावडे, नेरुळ, नवी मुंबई शाखेचे माजी प्राचार्य श्री. भिमराव आडसूळ, तितिक्षा इंटरनॅशनल संस्थेच्या संस्थापक अध्यक्षा सौ. प्रिया दामले, माध्यमिक विभागाचे शिक्षक प्रतिनिधी श्री. युवराज मिरखलकर, उच्च माध्यमिक विभागाचे शिक्षक प्रतिनिधी श्री. प्रमोद चंदनशिवे, स्टेट बँक ऑफ इंडिया, पुणे सिटी शाखेचे व्यवस्थापक श्री. अनुज राणा या सर्वांच्या हस्ते डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. यानंतर ईशस्तवन सादर करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि उपस्थितांचे स्वागत प्राचार्य व्हि. पी. गावडे यांनी केले. या प्रसंगी स्टेट बँक ऑफ इंडिया, पुणे सिटी शाखेचे व्यवस्थापक श्री. अनुज राणा आणि दत्तवाडी शाखेच्या व्यवस्थापक सौ. पौर्णिमा क्षीरसागर यांनी प्राचार्य व्हि. पी. गावडे आणि प्रशालेतील सर्व शिक्षकांचा भेटवस्तू देऊन सत्कार केला. तसेच जनता सहकारी बँक, टिळक रोड शाखा, पुणे यांचेतर्फे आलेल्या सेवकांनी प्राचार्य व्हि. पी. गावडे आणि प्रशालेतील सर्व शिक्षकांचा पेन व गुलाबपुष्प देऊन सत्कार केला. तसेच तितिक्षा फाऊंडेशन यांचेतर्फे प्राचार्य व्हि. पी. गावडे आणि प्रशालेतील सर्व शिक्षकांचा पुस्तक, पेन, मेडल देऊन सत्कार करण्यात आला.

यानंतर स्टेट बँक ऑफ इंडिया, पुणे सिटी शाखेचे व्यवस्थापक श्री. अनुज राणा, दत्तवाडी शाखेच्या व्यवस्थापक सौ. पौर्णिमा क्षीरसागर, जनता सहकारी बँक, टिळक रोड शाखा, पुणे यांचेतर्फे आलेले सेवक, श्री. सुनिल रसाळ, श्री. किरण जगदाळे, सौ. सुलभा दुसाने या सर्वांना प्राचार्य व्हि. पी. गावडे यांनी गुलाबापुष्प देऊन आभार मानले.

तसेच तितिक्षा फाऊंडेशनचे पदाधिकारी डॉ. मधुसूदन घाणेकर, सौ. प्रिया दामले, श्री. सातपुते, सौ. भारती महाडिक यांना प्राचार्य व्हि. पी. गावडे यांनी भेटवस्तू देऊन आभार व्यक्त केले.

अध्यापिका श्रीमती वैशाली मोघे यांनी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या कार्याबद्दल माहिती देताना त्यांच्या विद्यार्थीदशेतील प्रेरणादायी कथा सांगितली. नेरुळ, नवी मुंबई शाखेचे माजी प्राचार्य श्री. भीमराव आडसूळ यांनीही आपल्या मनोगतामधून डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या कार्याविषयी सखोल माहिती दिली. डॉ. मधुसूदन घाणेकर यांनी सर्व शिक्षकांना शिक्षक दिनाच्या शुभेच्छा दिल्या. या प्रंसगी तितिक्षा फाऊंडेशनचे सेवक श्री. सातपुते यांनी काव्यगायन केले.

अध्यापक श्री. ज्ञानेश्वर दाते यांना टीडीएफ संघटनेतर्फे ‘आदर्श शिक्षक पुरस्कार’ मिळाल्याबद्दल प्राचार्य व्हि. पी. गावडे यांनी पुष्पगुच्छ देऊन सन्मानित केले. प्राचार्य व्हि. पी. गावडे यांच्याहस्ते नेरुळ, नवी मुंबई शाखेचे माजी प्राचार्य श्री. भीमराव आडसूळ यांना भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला. तसेच प्रशालेतील सर्व शिक्षकांचाही प्राचार्य व्हि. पी. गावडे यांच्याहस्ते भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला. या प्रसंगी सर्व शिक्षक - शिक्षकेतर सेवक उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अध्यापिका सौ. सुनंदा भाईक यांनी केले. कनिष्ठ महाविद्यालयाच्या अध्यापिका सौ. रूपाली चौथाई यांनी उपस्थितांचे आभार मानले. या प्रसंगी उत्कृष्ट असे फलक लेखनाचे काम अध्यापक श्री. युवराज मिरखलकर यांनी केले. शिक्षक दिनानिमित्त अध्यापक श्री. रमेश चौधरी आणि

अध्यापिका सौ. मंगल गीर यांचेतर्फे सर्व शिक्षक - शिक्षकेतर सेवक यांना अल्पोपहार देण्यात आला. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

**हिंदी दिन उत्साहास साजरा**

दि. १४ सप्टेंबर २०२४ रोजी हिंदी दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या प्रसंगी अध्यापिका सौ. सुजाता व्हनमाने यांनी विद्यार्थ्यांना हिंदी दिनाचे महत्त्व आणि हिंदी दिनाचा इतिहास सांगितला. यानिमित्ताने शुध्दे लेखन स्पर्धा, निबंध स्पर्धा, कविता पठण स्पर्धा घेण्यात आल्या. इ. ५ वी ते ९ वी च्या विद्यार्थ्यांनी अतिशय सुंदर हिंदी कविता गायन केले. हिंदी निबंध स्पर्धेत प्रशालेतील ३० विद्यार्थी सहभागी झाले होते. या कार्यक्रमाचे नियोजन अध्यापिका सौ. सुजाता व्हनमाने व सौ. रोशनी गायकवाड यांनी केले. सुंदर फलकलेखन अध्यापिका सौ. रोशनी गायकवाड यांनी केले होते. या कार्यक्रमास प्राचार्य व्हि. पी. गावडे यांचे अनमोल सहकार्य लाभले.

***

# मुक्तांगण इंग्लिश मिडियम स्कूल, सदाशिव पेठ शाखा

**संचालक : डॉ. आर. एस. कांबळे**

**मुख्याध्यापिका : सौ. शिल्पा चितारे**

**लेडी गावसकर शोभा पंडित यांची भेट**

गुरुवार दि. २९ ऑगस्ट २०२४ रोजी 'लेडी गावसकर' शोभा पंडित यांनी शाळेला सौजन्य भेट दिली. याप्रसंगी  कोषाध्यक्ष श्री. कृष्णाजी कुलकर्णी, संचालक डॉ. राजेंद्र कांबळे आणि संचालक श्री. रमेश कुलकर्णी, मुख्याध्यापिका सौ. मधुमती कदम, पर्यवेक्षिका सौ. स्वरूपा मोरे, लेखनिक माधुरी भालेराव उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. भारती पऱ्हाड यांनी केले. पाहुण्यांची ओळख करून देताना सौ. प्राजक्ता मुरमट्टी यांनी श्रीमती शोभा पंडित यांच्या कार्याचा आढावा घेतला. श्रीमती शोभा पंडित यांनी विद्यार्थ्यांना खेळाचे विशेषतः क्रिकेटचे महत्त्व सहज सोप्या भाषेत सांगितले. त्यांनी मुंबई क्रिकेट असोसिएशनतर्फे विद्यार्थ्यांसाठी क्रिकेट किट भेट दिले. विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. रोशनी मणियार यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले.

**श्रावण साज**

शनिवार दि. ३१ ऑगस्ट २०२४ रोजी 'श्रावण साज' हा कार्यक्रम साजरा केला गेला. या प्रसंगी शाळेच्या दोन्ही विभागाच्या मुख्याध्यापिका सौ. शिल्पा चितारे आणि सौ. मधुमती कदम यांनी सरस्वती पूजन करून कार्यक्रमाची सुरूवात केली. श्रावण महिन्याचे महत्त्व विशद करणारे अनेक कार्यक्रम सादर केले गेले. नागपंचमी, रक्षाबंधन, दहीहंडी असे श्रावण महिन्याचे सगळे सण आणि त्यांच्याकडे आधुनिक दृष्टीने पाहण्याची गरज यांतून अधोरेखित करण्यात आली. दि. १५ ऑगस्ट २०२४ रोजी स्वातंत्र्यदिनही साजरा करण्यात आला.

**गणेशोत्सव उत्साहात संपन्न**

शाळेत गणेशोत्सव साजरा करण्यात आला. मुख्याध्यापिका सौ. मधुमती कदम यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले. पूर्ण गणेशोत्सव काळात इ. १ली ते १०वीच्या विद्यार्थ्यांच्या विविध स्पर्धा घेण्यात आल्या. मखर सजावट, गणपतीचे दागिने तयार करणे, रांगोळी स्पर्धा, श्लोक स्पर्धा यांचे आयोजन करण्यात आले. क्रमवार आठवडाभर सर्व वर्गातील विद्यार्थी, वर्ग शिक्षक, रिक्षावाले काका, निर्धार संस्था सदस्य या सर्वांनी बाप्पाची आरती केली. शेवटच्या दिवशी पालक प्रतिनिधींची आरती, मोदक बनविणे स्पर्धा झाली सर्व स्पर्धांमधील यशस्वी विद्यार्थ्यांना पारितोषिके पालक प्रतिनिधींच्या हस्ते देण्यात आली. इ.८वीच्या विद्यार्थ्यांनी बर्शी नृत्य सादर केले आणि कार्यक्रमाची शोभा वाढवली.

***

## ❊ मुक्तांगण इंग्लिश मिडियम स्कूल, सदाशिव पेठ शाखा ❊



लेडी गावसकर शोभा पंडित यांच्या हस्ते 'क्रिकेट किट'ची भेट स्वीकारताना श्रीमती माधुरी भालेराव, समवेत कोषाध्यक्ष श्री. कृष्णाजी कुलकर्णी, संचालक डॉ. राजेंद्र कांबळे व संचालक श्री. रमेश कुलकर्णी

संस्थेतील कुलगुरु कै. दादासाहेब केतकर स्मारक येथे श्रीमती शोभा पंडित यांच्या समवेत मुख्याध्यापिका, शिक्षिका आणि सेविका





मुख्याध्यापिका सौ. मधुमती कदम, शिक्षिका, पालक प्रतिनिधींसमवेत विविध स्पर्धांमधील विजेते विद्यार्थी



गणेशोत्सवानिमित्त ढोल ताशांचे वादन करताना विद्यार्थी पथक

## विद्याप्रशाला हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय
### तळेगाव अंजनेरी शाखा, नाशिक
**संचालक : श्री. अमोल म. जोशी**
**मुख्याध्यापक : श्री. शरद कोठावदे**

**महावाचन उत्सव २०२४**

विद्यालयात ग्रंथालय समिती तर्फे १६ ऑगस्ट ते ३१ ऑगस्ट २०२४ 'महावाचन उत्सव २०२४' हा उपक्रम उत्साहात साजरा करण्यात आला. या मध्ये इ. ५ वी ते १२वी च्या विद्यार्थ्यांनी त्यांच्या आवडीच्या विषयांच्या पुस्तकाचे वाचन करून आपला पुस्तक अभिप्राय लिखित स्वरूपात दिला. सदर अभिप्रायांमधून प्रत्येक गटातून तीन उत्कृष्ट अभिप्राय निवडण्यात आले.

**गट क्रमांक १- इयत्ता ५ वी**

| विद्यार्थ्याचे नाव | इ / तु | क्रमांक |
|---|---|---|
| कु. अनुष्का रमेश दाते | ५ वी अ | प्रथम |
| कु. माधुरी रमेश मुंजे | ५ वी अ | द्वितीय |
| कु. गौरी अरुण निबेकर | ५ वी अ | तृतीय |
| **गट क्रमांक २ - इयत्ता ६ वी ते ८ वी** | | |
| कु. साक्षी रतन चव्हाण | ८ वी अ | प्रथम |
| कु. सर्वेश योगेश मोरे | ६ वी अ | द्वितीय |
| कु. खुशी राहुल शिंदे | ७ वी ब | तृतीय |
| **गट क्रमांक ३ - ९वी ते १२वी** | | |
| कु. हर्षदा महादू सदगीर | १० वी अ | प्रथम |
| कु. गौरव रतन महाले | १० वी अ | द्वितीय |
| कु. कार्तिकी भाऊसाहेब महाले | १० वी अ | तृतीय |

यशस्वी विद्यार्थ्यांचा प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला.

**माझी शाळा सुंदर शाळा उपक्रम**

दि. २२ ऑगस्ट २०२४ व २३ ऑगस्ट २०२४ या कालावधीत विद्यालयात माझी शाळा सुंदर शाळा उपक्रम राबविण्यात आला या अंतर्गत वर्ग सजावट स्पर्धा घेण्यात आली सर्व वर्गांचे निरीक्षण करून पुढील प्रमाणे निकाल जाहीर करण्यात आला.

| क्रमांक | इयत्ता |
|---|---|
| प्रथम | नववी ब |
| द्वितीय | आठवी क |
| तृतीय | सातवी ब |

**वेशभूषा स्पर्धा निकाल**

| क्रमांक | इयत्ता | विषय |
|---|---|---|
| प्रथम | सहावी | दाक्षिणात्य वेशभूषा |
| द्वितीय | दहावी | बंगाली वेशभूषा |
| तृतीय | आठवी | पंजाबी वेशभूषा |

**नदी प्रदूषणाविरुध्द शपथ व घोषवाक्य स्पर्धा**

पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी नद्यांचे प्रदूषण रोखणे आवश्यक आहे यासाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून त्यांना नदी प्रदूषणाविरुद्ध शपथ देण्यात आली, त्याचे वाचन सौ. सुषमा अमृतकर यांनी केले.

नदी प्रदूषण रोखण्यासाठी जागृती करण्याच्या हेतूने घोषवाक्य स्पर्धा घेण्यात आली, त्याचा निकाल पुढीलप्रमाणे जाहीर करण्यात आला

| क्रमांक | विद्यार्थ्याचे नाव | इयत्ता |
|---|---|---|
| प्रथम | कु. श्रावणी नामदेव पगार | दहावी |
| द्वितीय | कु. खुशी एकनाथ शिंदे | आठवी अ |
| तृतीय | कु. यश चंद्रकांत पगार | सातवी अ |

स्पर्धेचे परीक्षण सौ सुषमा अमृतकर व श्रीमती प्रतिभा ठाकूर यांनी केले.

**कै.अण्णासाहेब खैर स्मृतिदिन व क्रीडादिन**

दि. २९ ऑगस्ट २०२४ रोजी विद्यालयात गुरूवर्य कै. डॉ. अण्णासाहेब खैर यांचा स्मृतिदिन साजरा करण्यात आला. मुख्याध्यापक श्री. शरद कोठावदे यांनी कै. डॉ. अण्णासाहेब खैर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहिली. यावेळी मनोगत व्यक्त करताना श्री. सुरेश वाघमारे यांनी कै. अण्णांनी संस्थेच्या विकासासाठी केलेले कार्य, भगवद् गीतेवर दिलेली व्याख्याने याची माहिती विद्यार्थ्यांना करून दिली. तसेच

हॉकी के जादूगर म्हणून प्रसिद्ध असलेले कर्नल ध्यानचंद यांच्या जयंती दिनी, साजरा होत असलेल्या क्रीडा दिनाची ओळख करून दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन सुषमा अमृतकर यांनी केले. आभार श्रीमती प्रतिभा ठाकूर यांनी मानले.

### श्री चक्रधर स्वामी जयंती

दि. ५ सप्टेंबर २०२४ रोजी महानुभाव पंथाचे संस्थापक श्री चक्रधर स्वामी यांची जयंती विद्यालयात साजरी करण्यात आली. श्री. सुरेश वाघमारे यांनी श्री चक्रधर स्वामी यांच्या जीवन कार्याविषयी माहिती दिली. यावेळी गौळाने येथील महानुभाव पंथाचे साधक श्री. विजय थापेकर यांनी श्री चक्रधर स्वामी यांची प्रतिमा भेट दिली, त्यांचा सत्कार मुख्याध्यापक श्री. शरद कोठावदे यांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन श्रीमती प्रतिभा ठाकूर यांनी केले. आभार श्रीमती सोनाली तुंगार यांनी मानले.

### शिक्षक दिन

दि. ५ सप्टेंबर २०२४ रोजी शिक्षक दिन विद्यालयात साजरा करण्यात आला. या दिवशी विद्यालयाचे सर्व कामकाज विद्यार्थ्यांनी केले. मुख्याध्यापिका म्हणून विद्यार्थिनी कु. कार्तिकी महाले हिने कामकाज सांभाळले. याप्रसंगी आयोजित केलेल्या कार्यक्रमात मुख्याध्यापक श्री. शरद कोठावदे यांनी सर्वांचे स्वागत केले. संचालक श्री. अमोल जोशी यांच्या हस्ते डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन् यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी तसेच शिक्षक दिनाचे औचित्य साधून शिक्षक म्हणून कार्य केलेल्या विद्यार्थी शिक्षक शिक्षिकांचा सत्कार संचालकांच्या हस्ते करण्यात आला. विद्यार्थिनी कु. संगिता ढोन्नर, कु. गौरी कडलग, कु. पूजा दाते, कु. हर्षदा सदगीर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. संस्थेचे कुलसचिव श्री. दिनेश पितांबर मिसाळ यांनी कै. पितांबर बापू मिसाळ यांच्या पुण्यस्मरणार्थ दिलेल्या देणगी व्याज विनियोगातून प्रतिवर्षी दिला जाणारा सेवा जेष्ठ शिक्षक पुरस्कार श्री. सुकदेव निंबेकर यांना स्मृतिचिन्ह, शाल व श्रीफळ या स्वरूपात शाखा संचालक श्री. अमोल जोशी यांच्या शुभहस्ते प्रदान करण्यात आला. आपल्या अध्यक्षीय मनोगतात संचालक श्री. अमोल जोशी यांनी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन् यांच्या कार्याचा गौरव करताना विद्यार्थ्यांनी शिक्षकांचा आदर राखला पाहिजे असे प्रतिपादन केले. यावेळी त्यांनी पॅराऑलिंम्पिक मध्ये पदक विजेत्या खेळाडूंचेही अभिनंदन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक समिक्षा गांगोडे, आभार पूजा दाते हिने मानले तर, सूत्रसंचालन समिक्षा तालखे हिने केले.

### गणेशोत्सव

विद्यालयात गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. गणेश चतुर्थीच्या दिवशी मुख्याध्यापक श्री. शरद कोठावदे यांच्या शुभहस्ते खुशी हरी धोंगडे या विद्यार्थिनीने शाडू माती पासून तयार केलेल्या गणपती मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली. गणेशोत्सवा निमित्त विद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.

### श्री गणेशमूर्ती बनविणे स्पर्धा

| क्रमांक | विद्यार्थ्याचे नाव | इ / तु |
|---|---|---|
| प्रथम | कु. खुशी हरी धोंगडे | आठवी अ |
| द्वितीय | कु. ऋतुजा नवनाथ पगार | दहावी अ |
| तृतीय | कु. निकिता तानाजी हांबरे | पाचवी ब |

परीक्षक : मुख्याध्यापक श्री शरद कोठावदे व श्रीमती रक्षा शिवदे

### स्तोत्र पठण स्पर्धा

| क्रमांक | विद्यार्थ्याचे नाव | इयत्ता |
|---|---|---|
| प्रथम | कु. ज्ञानेश्वरी किशोर पगार | आठवी अ |
| द्वितीय | कु. प्रांजल बाजीराव दाते | सहावी अ |

परीक्षक : श्री लक्ष्मण चव्हाण व श्रीमती प्रीती राजपूत

### गायन स्पर्धा

#### लहान गट

| क्रमांक | विद्यार्थ्याचे नाव | इयत्ता |
|---|---|---|
| प्रथम | कु. निकिता तानाजी हांबरे | पाचवी ब |
| द्वितीय | कु. साई अरुण पगार | सातवी अ |

#### मोठा गट

| | | |
|---|---|---|
| प्रथम | कु. खुशी एकनाथ शिंदे | आठवी अ |
| द्वितीय | कु. तपस्या सुदाम भालेराव | दहावी अ |

परीक्षक : श्रीमती संगिता कुवर व श्रीमती सोनाली तुंगार

### वाद्य वादन स्पर्धा

| क्रमांक | इयत्ता |
|---|---|
| प्रथम | सातवी ब |
| द्वितीय | दहावी ब |

परीक्षक : श्री मंथन वाळुंज व श्री. विवेक गावित

### टाकाऊतून टिकाऊ वस्तू तयार करणे

#### लहान गट

| | |
|---|---|
| प्रथम | कु. शुभम शेवरे व कु. प्रथमेश निंबेकर |
| द्वितीय | कु. नूतन नंदकिशोर पगार |
| तृतीय | कु. साई पगार व कु. सोहम पगार |

#### मोठा गट

| | |
|---|---|
| प्रथम | कु. साक्षी पगार |
| द्वितीय | कु. शीतल दाते |
| तृतीय | कु. ऋतुजा पगार |

परीक्षक : सौ. स्वाती भावसार व श्रीमती रक्षा शिवदे

### चित्रकला स्पर्धा

#### लहान गट

| | |
|---|---|
| प्रथम | कु. दिया भालेराव |
| द्वितीय | कु. अश्विनी भोईर |
| तृतीय | कु. शिवानी धोंगडे |

#### मोठा गट

| | |
|---|---|
| प्रथम | कु. निशांत मोरे |
| द्वितीय | कु. स्नेहल दाते |
| तृतीय | कु. खुशी धोंगडे |

परीक्षक : श्री. प्रकाश गवळी व श्रीमती मोहिनी पंगुडवाले

श्री गणेश विसर्जनाच्या दिवशी पारंपरिक वेशभूषा करून आलेल्या विद्यार्थ्यांनी 'गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या' चा गजर करत लाडक्या बाप्पाला वाजत गाजत व आकर्षक नृत्य करत निरोप दिला. श्री गणेश मूर्तीचे पर्यावरण पूरक पद्धतीने विसर्जन करण्यात आले.

संपूर्ण गणेशोत्सवात खिरापतीचा प्रसाद श्रीमती प्रतिभा ठाकूर यांच्याकडून विद्यार्थ्यांना देण्यात आला.

### किशोरवयीन विद्यार्थिनींसाठी मार्गदर्शन व्याख्यान

दि. १९ सप्टेंबर २०२४ रोजी विद्यालयात 'सती सावित्री समिती' अंतर्गत इयत्ता पाचवी ते बारावीच्या किशोरवयीन विद्यार्थिनींसाठी मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित करण्यात आले. तळेगाव आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. वसुधा सोनवणे यांनी विद्यार्थिनींना पोषक आहार घेण्याचे महत्त्व तसेच अनेमिया याविषयी सखोल मार्गदर्शन केले. तसेच किशोरवयीन मुलींच्या समस्या वयानुरूप होणारे शारीरिक, मानसिक बदल, 'गुड टच बॅड टच' या विषयांवर अतिशय सोप्या भाषेत मार्गदर्शन केले. अनेक विद्यार्थिनींनीही आपल्या शंका डॉक्टरांना विचारल्या. मुख्याध्यापक श्री. शरद कोठावदे यांच्या हस्ते डॉ. सोनवणे यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन सुरेखा धामणे यांनी केले. आभार श्रीमती प्रतिभा ठाकूर यांनी मानले. कार्यक्रमास तळेगाव आरोग्य केंद्रातील कर्मचारी, विद्यालयातील स्त्री शिक्षिका व सर्व विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

### अभिनंदनीय क्रीडा वृत्त

शालेय क्रीडा विभागामार्फत दि. २५ ऑगस्ट २०२४ रोजी नशिक येथे झालेल्या तालुका स्तरीय धावण्याच्या स्पर्धेत विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी उत्तुंग यश मिळवले.

### १४ वर्षाखालील मुले

| विद्यार्थ्यांचे नाव | स्पर्धा प्रकार | प्राप्त क्रमांक |
|---|---|---|
| कु. साई मोरे | २०० मीटर धावणे | प्रथम |
| कु. कार्तिक पगार | ६०० मीटर धावणे | तृतीय |

### १४ वर्षाखालील मुली

| | | |
|---|---|---|
| कु. प्रतीक्षा पाडेकर | ६०० मीटर धावणे | प्रथम |

### १७ वर्षाखालील मुले

| | | |
|---|---|---|
| कु. आयुष महाले | ८०० मीटर धावणे | द्वितीय |
| कु. रोहित शिंदे | ३००० मीटर धावणे | द्वितीय |
| कु. ओंकार दाते | ३००० मीटर धावणे | तृतीय |

### १७ वर्षाखालील मुली

| | | |
|---|---|---|
| कु. शालिनी कोकाटे | ३००० मीटर धावणे | द्वितीय |

### १९ वर्षाखालील मुले

| | | |
|---|---|---|
| कु. वैभव चव्हाण | ४०० मीटर धावणे | द्वितीय |
| कु. कृष्णा खानवले | ८०० मीटर धावणे | द्वितीय |
| कु. वैभव ठमके | ३००० मीटर धावणे | प्रथम |

### १९ वर्षाखालील मुली

| | | |
|---|---|---|
| कु. लक्ष्मी सराई | ३००० मीटर धावणे | प्रथम |
| कु. धनश्री ढोन्नर | ३००० मीटर धावणे | द्वितीय |

या सर्व खेळाडूंची जिल्हा पातळीवर निवड झाली.

### कुस्ती स्पर्धा

कु. साहिल दशरथ मोरे याने कुस्ती स्पर्धेत जिल्हा पातळीवर प्रथम क्रमांक प्राप्त केला. त्याची विभागीय पातळीवर निवड झाली.

खेळाडू विद्यार्थ्यांना पर्यवेक्षक श्री संजय जोशी व क्रीडा शिक्षक श्री. संजय गीते यांचे मार्गदर्शन लाभले.

**सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व त्यांच्या मार्गदर्शक शिक्षकांचे संस्थेच्यावतीने हार्दिक अभिनंदन आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा !**

### अभिनंदनीय वृत्त

विद्यालयाचे क्रीडा शिक्षक श्री. संजय महादेव गीते यांना शिक्षक लोकशाही आघाडी व माध्यमिक शिक्षक संघ, पुणे शहर यांच्या वतीने 'गुणवंत शिक्षक पुरस्कार २०२४' प्रदान करण्यात आला.

श्री. संजय गीते यांचे संस्थेच्यावतीने हार्दिक अभिनंदन आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा ! ✻✻✻

**✻ विद्याप्रशाला हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, तळेगांव (अं.), नाशिक ✻**



**सखी सावित्री उपक्रमांतर्गत किशोर वयीन विद्यार्थिनीना मार्गदर्शन प्रसंगी डॉ. वसुधा सोनवणे, समवेत विद्यालयातील स्त्री शिक्षिका**

## विद्याभवन–घाटकोपर, मुंबई शाखा

**कार्याध्यक्ष : श्री. राजेंद्र वि. बोऱ्हाडे**

### विद्याभवन संकुल

**शिक्षक दिनानिमित्त शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी आरोग्य शिबिर**

आजकालच्या या धकाधकीच्या जीवनामध्ये शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे आरोग्य व्यवस्थित रहावे तसेच सर्वांनी आपले दैनंदिन काम करत आपल्या आरोग्याकडेही तेवढेच लक्ष द्यावे या भावनेतून कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे यांच्या प्रयत्नातून 'माझे विद्याभवन, माझे कुटुंब माझी जबाबदारी' ही संकल्पना राबविण्यात आली.

देवदेश प्रतिष्ठान, छबी सहयोग फाऊंडेशन आणि आरोग्य भारती यांच्या संयुक्त विद्यमाने देवदेश प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. वैभव देवगिरकर व सहकारी डॉक्टरांच्या सहकार्याने दि. ५ सप्टेंबर २०२४ रोजी पुणे विद्यार्थी गृहाचे विद्याभवन शालेय संकुल, घाटकोपर येथे शिक्षक दिनाचे औचित्य साधून आरोग्य शिबिराचे आयोजन केले होते. या शिबिरात आरोग्य, नेत्र, दंत आणि रक्त तपासणी करून शिक्षकांना निरोगी जीवनशैली विषयी मार्गदर्शन करण्यात आले.

कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे यांच्या हस्ते शिबिराचे उद्‌घाटन झाले. आरोग्य भारती कोकण प्रांताचे उपाध्यक्ष डॉ. नीलेराजी सिंघानिया यांनी उपस्थितांना आरोग्य भारतीची भूमिका व कार्याबद्दल माहिती दिली. डॉ. वैभव देवगिरकर यांच्या मार्गदर्शनाखाली देवेदश प्रतिष्ठान, छबी सहयोग फाऊंडेशन आणि आरोग्य भारती यांच्या सर्व स्वयंसेवकांनी शिबिराचे उत्तम नियोजन केले. या शिबिरात १८५ शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला.

तज्ज्ञ डॉक्टरांच्या टीमने सर्वांच्या आरोग्य तपासण्या केल्या आणि त्यांना निरोगी आरोग्य टिकविण्यासाठी विविध उपाय सुचविले. 'शिक्षक स्वस्थ तर भारत सशक्त' हा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

**गणेशोत्सव**

दि. ७ सप्टेंबर २०२४ रोजी दरवर्षीप्रमाणे आपल्या प्रशालेत श्री गणेशाचे आगमन मोठ्या जल्लोषात झाले. अनुसंधान समिती सदस्य प्राचार्य के. एन्. शिरकांडे व कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे यांच्या हस्ते श्री गणेशाची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली.

मंगळवार दि. १० सप्टेंबर २०२४ रोजी माजी विद्यार्थी मंडळ आयोजित 'अथर्वशीर्ष पारायण' करण्यात आले. या प्रसंगी श्री. राम कदम, कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे, अनुसंधान समिती सदस्य प्राचार्य के. एन. शिरकांडे, माजी विद्यार्थी मंडळाचे अध्यक्ष श्री. बा.गो. कुलकर्णी, मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक, समन्वयक तसेच माजी विद्यार्थी उपस्थित होते.

दि. ११ सप्टेंबर २०२४ रोजी प्रशालेतील विद्यार्थ्यांनी सुस्वर भजन व भक्तिगीतांचा कार्यक्रम सादर केला. या कार्यक्रमास मा. श्री. पराग शाह, कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे, मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

दि. १२ सप्टेंबर २०२४ रोजी सभागृहात श्रीगणेशासमोर प्रशालेच्या विद्यार्थिनींनी उत्तम असे लेझिमचे प्रात्यक्षिक सादर केले. उत्साहाच्या वातावरणात, ढोल-ताशाचा गजरात श्री गणेशाची आरती करण्यात आली. आरती झाल्यानंतर श्री गणेशाच्या विसर्जनासाठी पवई येथे सर्व विद्यार्थी, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत व ढोल-ताशाच्या गजरात बाप्पाला निरोप देण्यात आला.

या प्रसंगी कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे व अनुसंधान समिती सदस्य प्राचार्य के. एन. शिरकांडे उपस्थित होते.

**सेवापूर्ती समारंभ**

श्रीमती सिध्दी साळवी स्वाध्याय परिवाराच्या प्रणेत्या, पूर्व प्राथमिक सेमी इंग्रजी विभागाच्या पर्यवेक्षिका नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाल्या.

त्यांच्या निरोप समारंभाचा कार्यक्रम दि. ५ सप्टेंबर २०२४ रोजी महाविद्यालयाच्या सेमिनार हॉलमध्ये पार पडला. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून माजी विद्यार्थी मंडळाचे अध्यक्ष डॉ. बा. गो. कुलकर्णी व समन्वयिका श्रीमती शुभांगी जाधव उपस्थित होत्या. या प्रसंगी प्राथमिक इंग्रजी विभागाच्या मुख्याध्यापिका श्रीमती अनघा सावंत, प्राथमिक मराठी विभागाचे मुख्याध्यापक श्री. गणेश कणसे, पूर्व प्राथमिक इंग्रजी विभागाच्या समन्वयिका श्रीमती लक्ष्मी गोपालक्रिष्णन् व पर्यवेक्षिका श्रीमती पूजा फरिया उपस्थित होत्या.

पूर्व प्राथमिक इंग्रजी व सेमी इंग्रजी तसेच प्राथमिक इंग्रजी व प्राथमिक मराठी विभागातील सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी या कार्यक्रमासाठी आवर्जून उपस्थित होते.

बहुतेक वक्त्यांनी आपल्या भाषणामध्ये श्रीमती सिध्दी साळवी यांच्या कार्याचा गौरव केला. श्रीमती सिध्दी साळवी यांनी आपल्या २४ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेमधील अनुभव सांगून कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे आणि अनुसंधान समिती सदस्य प्राचार्य श्री. के. एन. शिरकांडे यांच्या प्रति कृतज्ञतेची भावना व्यक्त केली.

प्रमुख पाहुणे श्री. डॉ. बा. गो. कुलकर्णी यांनी श्रीमती सिध्दी साळवी यांना त्यांच्या नावातच सिध्दी आहे आणि त्यामुळे त्यांना सर्व गोष्टी आपसूक प्राप्त होतच राहतील, तसेच श्रीमती सिध्दी साळवी यांनी माजी विद्यार्थी मंडळाच्या कार्यास हातभार लावावा अशी विनंती केली.

वेगवेगळ्या भेटवस्तू देऊन प्रत्येक विभागाने श्रीमती सिध्दी साळवी यांना निरोप दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहा. शिक्षिका श्रीमती सोनाली ढेरंगे यांनी केले आणि आभार प्रदर्शन सहा. शिक्षिका श्रीमती नयना बढे यांनी केले.

## पुणे विद्यार्थी गृह माजी विद्यार्थी मंडळ, मुंबई शाखा

**सदाचार चिंतनी वक्तृत्व स्पर्धा**

पुणे विद्यार्थी गृह माजी विद्यार्थी मंडळ, मुंबई आयोजित सदाचार चिंतनी वक्तृत्व स्पर्धा दि. २३ ऑगस्ट २०२४ रोजी विद्याभवन प्रशालेत आयोजित करण्यात आली होती.

गीतामहर्षी डॉ. ग. श्री. तथा अण्णासाहेब खैर यांनी आपले उत्तरायुष्य समाजात गीता व सदाचार प्रसार करण्यासाठी वाहिले. गुरूवर्य अण्णांच्या सदाचार चिंतनी भाग ५ मधील कोणतेही दोन विचार निवडून विद्यार्थ्यांनी त्याचे सादरीकरण केले.

कार्यक्रमाची सुरूवात गुरूवर्य अण्णा व दादासाहेब केतकर यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करुन, वंदन करून झाली. स्पर्धेसाठी मुख्याध्यापिका सौ. योगिनी पोतदार यांचे मार्गदर्शन लाभले. परीक्षक म्हणून श्री. गिरीश जोशी व श्रीमती रेवा गिरीश जोशी यांनी काम पाहिले. स्पर्धेमध्ये इ. ८वी ते इ. १० मधील १५ विद्यार्थी सहभागी झाले होते. अतिशय उत्तमरितीने विद्यार्थ्यांनी आपले विचार विविध उदाहरणे देऊन सर्वांसमोर मांडले.

वक्तृत्व स्पर्धेसाठी आशयाची मांडणी कशी करावी? सभाधीटपणा कसा असावा? तसेच सादरीकरण कसे असावे? याबद्दल अतियश मोलाचे मार्गदर्शन परीक्षक श्री. गिरीश जोशी यांनी केले. आभार प्रदर्शनाने स्पर्धेची सांगता झाली.

# विद्याभवन पूर्व प्राथमिक सेमी इंग्रजी
# विद्याभवन पूर्व प्राथमिक इंग्रजी

**कार्याध्यक्ष : श्री. राजेंद्र वि. बोऱ्हाडे**
**पर्यवेक्षिका : सौ. सिध्दी साळवी (सेमी इंग्रजी),**
**पर्यवेक्षिका : सौ. पूजा फरिया (इंग्रजी माध्यम)**

### रक्षाबंधन

शुक्रवार दि. १७ ऑगस्ट २०२४ रोजी पूर्व प्राथमिक सेमी इंग्रजी विभागाच्या विद्यार्थ्यांनी भाऊ बहिणीचे पवित्र नाते असलेला रक्षाबंधन हा सण साजरा केला. त्यासाठी विद्यार्थिनींनी आपल्या भावांसाठी राख्या आणल्या होत्या व विद्यार्थ्यांनी आपल्या बहिणींसाठी भेटवस्तू आणल्या होत्या. शाळेच्या कॉरिडॉरमध्ये सर्व विद्यार्थ्यांना बसविण्यात आले. चिमुकल्या बहिणींनी आपल्या भावांचे औक्षण करून त्यांना राख्या बांधल्या व विद्यार्थ्यांनी भेटवस्तू म्हणून आणलेल्या वस्तू आपल्या बहिणीला दिल्या. सर्व विद्यार्थ्यांना भाऊ बहिणीच्या नात्याची माहिती सांगण्यात आली. ज्युनिअर के.जी. व सिनिअर के.जी. च्या शिक्षकांनी सर्व विद्यार्थ्यांकडून 'राखी बनविणे उपक्रम' करून घेतला. विद्यार्थ्यांनी या ॲक्टिव्हिटी चा छान आनंद घेतला. सर्व विद्यार्थ्यांना चॉकलेट देण्यात आले.

### श्रीकृष्ण जन्म व दहीहंडी

सोमवार दि. २६ ऑगस्ट २०२४ रोजी पूर्व प्राथमिक सेमी इंग्रजी व इंग्रजी विभागाच्या विद्यार्थ्यांनी श्रीकृष्ण जन्म व दहीहंडी उत्सव साजरा केला. इंग्रजी माध्यमाच्या पूर्व प्राथमिक विद्यार्थ्यांनी कृष्ण जन्माष्टमीला कृष्णाच्या आयुष्यातील अनेक प्रसंग व दंतकथा अत्यंत जोशपूर्ण आणि हृदयस्पर्शी पध्दतीने सादर केल्या. सेमी इंग्रजी माध्यमाच्या विद्यार्थ्यांना शाळेच्या आप्पासाहेब गरगटे सभागृहात नेण्यात आले. समन्वयिका श्रीमती शुभांगी जाधव, पर्यवेक्षिका श्रीमती सिद्धी साळवी व प्राथमिक मराठी विभागाचे मुख्याध्यापक श्री. गणेश कणसे यांच्या हस्ते पारंपरिक पध्दतीने श्रीकृष्णाचे पूजन करण्यात आले. सर्वांनी श्रीकृष्णाचा पाळणा झुलवला. मोठ्या शिशुच्या विद्यार्थ्यांनी श्रीकृष्ण जन्माची नाटिका सादर केली. त्यासाठी त्यांनी वसुदेव-देवकी, नंद-यशोदा, शेषनाग, राधिका, श्रीकृष्ण इ. विविध वेशभूषा धारण केल्या होत्या. तसेच विद्यार्थिनींनी श्रीकृष्णाच्या गाण्यावर नृत्य सादर केले. इंग्रजी माध्यमामध्ये कार्यक्रमाची सुरूवात कृष्णाच्या जन्माने झाली. त्यानंतर कृष्णाच्या विविध बाललीला, त्याचे लोणी चोरून खाणे आणि यशोदा मातेला आश्चर्यचकित करणे इत्यादी गोष्टी दाखविल्या गेल्या. नंतर कालिया नागाला काबूत आणणारा वीरता पूर्ण प्रसंग दाखविला. गोवर्धन पर्वत आपल्या करंगळीवर उचलून गावकऱ्यांचे रक्षण करणारा प्रसंग व त्यानंतरची आनंददायी रासलीला याचे चित्रमय दर्शन घडविले. बालपणीचे मित्र कृष्ण आणि सुदामा या दोघांची हृदयस्पर्शी भेट सुंदर पध्दतीने अभिनित केली गेली आणि त्यानंतर कार्यक्रमाचा उच्च बिंदू म्हणजे कंसाचा पराभव आणि कृष्णाचे विराट भव्य स्वरूप दाखविले गेले. उत्तम व रंगीबेरंगी वस्त्रे, चेहऱ्यावरील उत्तम हावभाव व अत्यंत भक्तीपूर्ण असे सादरीकरण यामुळे प्रत्येक प्रसंग जिवंत वाटला. सर्व विद्यार्थ्यांना शाळेच्या आवारात नेण्यात आले जेथे दहीहंडी छान सजवून बांधण्यात आली होती. गाणी म्हणत वसुदेव, पेंद्या, सुदामा, श्रीकृष्ण, राधा यांनी शिक्षकांच्या मदतीने 'गोविंदा रे गोपाला', 'यशोदेच्या नंद लाला' या गाण्यांवर ठेका घेत हंडी फोडली. शेवटी नारळ, केळी, काकडीचा प्रसाद सर्वांना देण्यात आला. अशा प्रकारे सर्व विद्यार्थ्यांनी दहीहंडीचा आनंद लुटला. याप्रसंगी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी बहुमूल्य सहकार्य केले.

## विद्याभवन प्राथमिक इंग्रजी
## विद्याभवन प्राथमिक मराठी

**कार्याध्यक्ष : श्री. राजेंद्र वि. बोऱ्हाडे**
**मुख्याध्यापिका : श्रीमती अनघा संतोष सावंत**
**मुख्याध्यापक : श्री. गणेश सुदाम कणसे**

### व्याख्यानाचे आयोजन

बुधवार दि. २१ ऑगस्ट २०२४ रोजी इ. ३री व ४थी च्या पालकांसाठी डॉ. अपर्णा गोविंद यांचे आरोग्य आणि आहार याविषयी व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

पालकांनीही आपल्या पाल्यांसोबत नियमित व्यायाम करावा आणि स्वतःला तंदुरुस्त ठेवावे. तसेच मुलांच्या आहाराविषयी त्यांनी पालकांना सखोल माहिती दिली. दुपारच्या जेवणाच्या डब्यात काय द्यावे? आणि काय देऊ नये? याविषयी त्यांनी पालकांशी चर्चा केली. विद्यार्थ्यांना आवडत्या गोष्टी कशा वेगळ्या पध्दतीने देता येतील याविषयी त्यांनी मोलाचा सल्ला दिला. कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे यांनी आपल्या ऑफिसमध्ये सर्व शिक्षकांबरोबर चर्चा केली व डॉ. अपर्णा गोविंद यांनी प्राथमिक मराठी व इंग्रजी विभागातील सर्व शिक्षकांना आरोग्य विषयी मूलमंत्र दिला. नियमित थोडासा व्यायाम आणि संतुलित आहार याबाबत त्यांनी सर्वांना प्रोत्साहित केले. या व्याख्यानानंतर, पालकांनी देखील रोज व्यायाम करून आपण आपल्या कुटुंबाला चांगल्या पध्दतीने कसे ठेवू शकू याविषयी सल्ला दिला. सहा. शिक्षिका श्रीमती रेश्मा पैलकर यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली आणि श्रीमती स्नेहा राणे यांनी उपस्थित पालकांचे आभार मानले.

### दहीहंडी

''हाती घोडा पालखी जय कन्हैया लाल की'' असा जयघोष, श्री कृष्ण राधा यांची वेशभूषा आणि दहीहंडी फोडण्यासाठी बाळगोपाळांकडून लावले जाणारे थर अशा उत्साहाच्या वातावरणात विद्याभवन प्राथमिक इंग्रजी विभागात दहीहंडी उत्सव साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाचा विद्यार्थ्यांनी मनमुराद आनंद लुटला. 'गोविंदा आला रे आला........' अशा गाण्यावर विद्यार्थ्यांनी दहीहंडी फोडण्याचा आनंद घेतला. शाळेतील इ. ४थी च्या विद्यार्थ्यांच्या पथकाने दोन थर लावत ही दहीहंडी फोडताच विद्यार्थ्यांनी एकच जल्लोष केला. 'एक, दोन, तीन, चार विद्याभवन ची पोरं हुशार.....' असे म्हणत यावर्षी इ. ३री व ४थी च्या विद्यार्थिनींनी देखील दहीहंडी फोडून आपला आनंद व्यक्त केला. याप्रसंगी प्राथमिक इंग्रजी विभागाच्या मुख्याध्यापिका श्रीमती अनघा सावंत उपस्थित होत्या.

इ. १ली ते ४थी चे सर्व विद्यार्थी या कार्यक्रमात सहभागी झालेले होते. बाल शिवाजी महाराजांनी आपल्या मावळ्यांसोबत 'Protect Girls Save Future' या थीमला अनुसरून प्रतिकात्मक दहीहंडी देखील फोडली. अशा पध्दतीने दहीहंडीचा हा सण अतिशय जल्लोषात आणि उत्साहात विद्याभवनच्या प्रांगणात साजरा झाला.

### आंतरराष्ट्रीय खेल दिन

आंतरराष्ट्रीय खेल दिनाचे औचित्य साधून पूर्व प्राथमिक सेमी इंग्रजी व इंग्रजी आणि प्राथमिक इंग्रजी या विभागांच्या मदतीने हा दिवस साजरा करण्यात आला.

इ. ४थीतील विद्यार्थ्यांनी एकेका खेळाडू विषयी माहिती संपादित केलेली होती. आवडत्या खेळाडूचा फोटो चिकटवून त्याच्याबद्दल थोडक्यात माहिती विद्यार्थ्यांनी लिहिलेली होती. अग्नि, जल, वायू, पृथ्वी या चारही हाऊसमधील सर्व विद्यार्थी यावेळी रॅलीमध्ये सहभागी झाले होते. ढोल ताशांच्या गजरात छोटे-छोटे खेळाडू जसे की मीराबाई चानू, नीरज चोप्रा, मनू भाकर, भारतीय हॉकी टीम, पी. व्ही. सिंधू व भारतीय क्रिकेट टीम इत्यादी, लहान चमू या रॅलीमध्ये सहभागी झाले होते.

विद्यार्थ्यांनी इंटरनेट मोबाईलच्या या दुनियेत स्वतःला हरवून न जाता विविध मैदानी खेळ खेळावेत असे आवाहन ज्येष्ठ शिक्षिका श्रीमती स्नेहा राणे यांनी

केले. मुख्याध्यापिका श्रीमती अनघा सावंत यांनी विद्यार्थ्यांनी किमान एक तास तरी मैदानावर खेळायला जावे असा मौलिक सल्ला दिला. यावेळी पूर्व प्राथमिक इंग्रजी विभागाच्या समन्वयिका श्रीमती लक्ष्मी गोपालक्रिष्णन् तसेच पर्यवेक्षिका श्रीमती सिध्दी साळवी उपस्थित होत्या.

**विद्यार्थ्यांना नाजूक विषयाची माहिती**

पंतनगर पोलिस स्टेशनच्या वरिष्ठ पोलिस निरीक्षक श्रीमती तृप्ती आठवले आणि श्रीमती खरात यांनी इ. ३री आणि ४थी च्या सर्व विद्यार्थ्यांना 'गुड टच आणि बॅड टच' याविषयी आप्पासाहेब गरगटे सभागृहामध्ये माहिती दिली. सध्या समाजात ज्या काही बातम्या आपल्याला ऐकायला येतात त्यातूनच बदलापूर सारख्या घटनेची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी महानगरपालिकेने जी नियमावली घालून दिलेली आहे त्यातीलच एक प्रकार म्हणजे विद्यार्थ्यांना 'गुड टच आणि बॅड टच' याविषयी माहिती देणे. पोलिसांनी विद्यार्थ्यांना या नाजूक विषयाची माहिती खूप विश्वासात घेऊन सांगितली. याप्रसंगी मुख्याध्यापिका श्रीमती अनघा सावंत यांनी मान्यवरांचे आभार मानले.

## विद्याभवन माध्यमिक मराठी

**कार्याध्यक्ष : श्री. राजेंद्र वि. बोऱ्हाडे**

**मुख्याध्यापिका : श्रीमती योगिनी राजेंद्र पोतदार**

**बदलापूर येथे घडलेल्या घटनेच्या अनुषंगाने आयोजित केलेली बैठक**

गुरुवार दि. २९ ऑगस्ट २०२४ रोजी बदलापूर येथे शाळेमधील लहान मुली संदर्भात घडलेल्या घटनेच्या अनुषंगाने कायदा व सुव्यवस्थेचा मोठा प्रश्न निर्माण झालेला होता. त्या पार्श्वभूमीवर पोलिस ठाणे हद्दीतील सर्व महाविद्यालयांचे प्रिन्सिपॉल्स व शाळांचे मुख्याध्यापक यांची कालिदास सभागृह, मुलुंड (प) या ठिकाणी सकाळी ११.०० वाजता बैठक आयोजित करण्यात आली होती.

या बैठकीत Zone VII – Mumbai यांच्यामार्फत Drugs Free School याबाबत वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री. पुरुषोत्तम कराड यांनी मार्गदर्शन केले. प्रत्येक शाळेच्या जवळ कुठेही पान टपरी असल्यास त्या बंद केल्या जातील असे त्यांनी सांगितले.

त्यानंतर जागृत मुंबईकर अभियान या संदर्भात PPT दाखविण्यात आली. तसेच सुरक्षा शाखेच्या पोलीस उपनिरीक्षक श्रीमती प्रभा राऊत (९८७०२२१५२३) यांनी विद्यार्थ्यांमध्ये असलेल्या धूम्रपान, थिनर, गुटखा इ. च्या वाढत्या व्यसनाधीनते बाबत सतर्कता बाळगावी असे सांगितले. तसेच सायबर क्राईम, विद्यार्थ्यांमधील मारामारी त्याबाबत लगेचच पोलीस स्टेशनशी संपर्क साधावा असेही सांगितले. पालकांना मार्गदर्शन घ्यावयाचे असल्यास पोलिस कधीही उपलब्ध होऊ शकतील असेही सांगितले.

त्यानंतर निर्भया सादरीकरण PPT दाखविण्यात आली. शाळेच्या आजूबाजूला ज्या ठिकाणी Dark Spot असेल म्हणजेच निर्जन ठिकाण असेल तेथे लाईटची व्यवस्था करावी. Youth on the move चे संस्थापक श्री. रोहित मिश्रा यांनी Awareness on Narcotic Substances तसेच सायबर क्राईम आणि अँटी ड्रग याबाबत माहिती दिली.

बृहन्मुंबई महानगरपालिका शिक्षण अधिकारी श्री. शरद कुडवे यांनी मुख्याध्यापकांनी आठवड्यातून तीन वेळा CCTV footage तपासणे, तसेच सफाई कामगारांची Police Verification नोंद ठेवणे.

* ६ वर्षापर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी महिला कर्मचारी असावेत. तक्रार पेटी शाळेत असणे गरजेचे.
* सखी सावित्री समिती स्थापन करणे. त्यात दोन मुलगे व दोन मुली सदस्य असणे आवश्यक अशा सूचना केल्या.

एन वॉर्डचे उपशिक्षण निरीक्षक श्री. संतोष कंठे यांनीही मार्गदर्शन केले. Upper Police Senior Inspector श्री. महेश पाटील यांनी समुपदेशन कक्षा बाबत मार्गदर्शन केले. कोणी तक्रार केली तर, आम्ही

उपलब्ध होऊ शकतो. जे विद्यार्थी व्हॅनने येतात त्यांचे details घेणे आवश्यक आहे, असेही सांगितले.

वरील सभेनंतर सदर सर्व मुद्दे शिक्षक सभा घेऊन शिक्षकांना सांगण्यात आले. तशी सविस्तर चर्चा करण्यात आली. विविध समित्या स्थापन करण्याविषयी सूचना देण्यात आल्या व त्या सभा घेण्याचे नियोजन करण्यास सांगण्यात आले.

सभेमध्ये झालेल्या सर्व विषयांची योग्य ती कार्यवाही करण्यात आली आहे.

**मासिक पाळी व्यवस्थापन व स्वच्छता**

CACR व MAFFEL यांच्या संयुक्त विद्यमाने प्रशालेतील सभागृहात इ. ६वी ते ९वी च्या विद्यार्थिनींसाठी 'मासिक पाळी व्यवस्थापन व स्वच्छता' या विषयावरील मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

यावेळी संस्थेच्या प्रतिनिधी श्रीमती लक्ष्मी व श्रीमती भाग्यश्री यांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. मार्गदर्शन करताना मासिक पाळी म्हणजे काय? मासिक पाळीशी संबंधित शारीरिक अवयव, मासिक पाळी येताना होणारे शारीरिक व मानसिक बदल, पाळीच्या वेळी घ्यावयाची काळजी, शारीरिक स्वच्छता, पाळी संदर्भातील अनेक गैरसमज व अंधश्रध्दा, संतुलित आहार, विश्रांती अशा अनेक गोष्टींबाबत माहिती दिली. तसेच विद्यार्थिनींना आलेल्या शंकांचे निरसन केले.

मुख्याध्यापिका सौ. योगिनी पोतदार यांनीही विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले व उपयुक्त माहिती सांगितल्याबद्दल प्रतिनिधींचे आभार मानले.

**सुरक्षा नुक्कड नाटक**

दि. २२ ऑगस्ट २०२४ रोजी SAKEC Cyber Peace Centre of excellence यांच्या संयुक्त विदयमाने प्रशालेतील सभागृहात इ. ८वी च्या विद्यार्थ्यांसाठी सायबर गुन्ह्यांपासून सतर्क राहणे या विषयावर मार्गदर्शन पर २-३ प्रसंगांवर आधारित नाटक आयोजित करण्यात आले होते.

यावेळी संस्थेचे प्रतिनिधी डॉ. निलाक्षी जैन व शहा ॲण्ड अँकर कॉलेजचे काही विद्यार्थी यांनी इ. ८ वीच्या विद्यार्थ्यांना जगात होणाऱ्या सायबर गुन्ह्यांपासून कसे सतर्क रहावे? या विषयावर २-३ प्रसंग नाट्यमय स्वरूपात दाखविले. सायबर गुन्हा होऊ नये यापासून आपण कसे जागरुक राहिले पाहिजे? या विषयी मार्गदर्शन केले आपल्यावर किंवा इतर कोणावर ही अशी वेळ आली तर १९३० या हेल्पलाईन नंबर वर कॉल करा व अधिक माहितीसाठी वेबसाईट वर संपर्क करा हे सांगितले आणि विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन केले.

मुख्याध्यापिका सौ. योगिनी पोतदार यांनीही इ. ८वीच्या सर्व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व उपयुक्त माहिती सांगितल्याबद्दल प्रतिनिधींचे आभार मानले.

**निसर्गमंडळ अंतर्गत श्रावणमेळा २०२४-२५**

दि. २३ ऑगस्ट २०२४ रोजी प्रशालेच्या आप्पासाहेब गरगटे सभागृहात निसर्ग मंडळ आयोजित 'श्रावणमेळा' २०२४-२५ हा उपक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून मुख्याध्यापिका सौ. योगिनी पोतदार, उपमुख्याध्यापिका श्रीमती ज्योती देसाई तसेच इंग्रजी माध्यमाचे मुख्याध्यापक श्री. सुनिल पाटील, समन्वयिका श्रीमती सरला नरेंद्रन् उपस्थित होत्या. या कार्यक्रमाची सुरूवात मंगळागौर पूजनाने झाली. मुख्याध्यापिका सौ. योगिनी पोतदार व उपमुख्याध्यापिका श्रीमती ज्योती देसाई यांच्या हस्ते मंगळागौरीची पूजली करण्यात आली.

यानंतर सांस्कृतिक कार्यक्रमाला सुरूवात झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. मयुरी आणि कु. संस्कृती या विद्यार्थिनींनी केले. कार्यक्रमाची प्रस्तावना आणि माहिती सहा.शिक्षिका श्रीमती रत्ना पाटील यांनी दिली. श्रावणातील सणांची कथा विद्यार्थिनी कु. आसावरी पाटील हिने सांगितली. श्रावणातील विविध गाणी, मंगळागौरीचे खेळ विद्यार्थिनींनी सादर केले. विद्यार्थिनींनी विविध सण आणि पदार्थ यांनी टेबल सजविले होते. पावसाळ्यातील रानभाज्या व त्यांचे महत्त्व सांगण्यात आले. पाहुण्यांनी सर्व स्टॉल्सना भेट देऊन विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

सहा.शिक्षक श्री. अर्जुन मस्के यांनी सुंदर फलकलेखन केले व माईक व्यवस्था केली. सर्व विद्यार्थ्यांना मुख्याध्यापिका श्रीमती योगिनी पोतदार यांनी श्रावणाचे महत्त्व, रानभाज्या खाण्याचे फायदे याविषयी मार्गदर्शन केले.

**निसर्गमंडळ अंतर्गत इको फ्रेंडली मखर स्पर्धा**

दि. ३१ ऑगस्ट २०२४ रोजी प्रशालेच्या आवारात इको फ्रेंडली मखर बनविणे ही स्पर्धा घेण्यात आली. ही स्पर्धा मुख्याध्यापिका सौ. योगिनी पोतदार यांच्या मार्गदर्शनाने निसर्ग मंडळाने आयोजित केली.

या स्पर्धेसाठी इ. ६वी व ७वी हा गट तसेच इ. ८वी व ९वी हा एक गट करण्यात आला. या दोन्ही गटात वैयक्तिक असे ६४ विद्यार्थी सहभागी झाले. तसेच दोन्ही गटातील विद्यार्थ्यांनी एकूण २० मखर बनविले.

सर्व मखर बनविण्यासाठी विद्यार्थ्यांनी पर्यावरण पूरक साहित्य, विविध संकल्पना घेऊन मखर बनविले. या प्रदर्शनाला इ. ५वी ते ८वी चे विद्यार्थी, शिक्षक आणि मुख्याध्यापिका सौ. योगिनी पोतदार तसेच उपमुख्याध्यापिका श्रीमती ज्योती देसाई यांनी भेट देऊन विद्यार्थ्यांचे कौतुक केले. सहा. शिक्षक श्री. अर्जुन मस्के यांनी स्पर्धेचे परीक्षण केले. स्पर्धेत विजयी झालेले विद्यार्थी खालीलप्रमाणे :

**इ. ६वी-७वी (वैयक्तिक)**

| **क्रमांक** | **विद्यार्थ्यांची नावे** | **इ./तु.** |
|---|---|---|
| प्रथम | कु. युगंधरा तुषार तोत्रे | ६वी/क |
| द्वितीय | कु. अवंतिका वरे | ६वी/अ |
| तृतीय | कु. स्वरा शिंदे | ६वी/ब |

**इ. ६वी-७वी (गटातून विजयी विद्यार्थी)**

| **क्रमांक** | **विद्यार्थ्यांची नावे** | **इ./तु.** |
|---|---|---|
| प्रथम | कु. स्वरा संजय नायकोडी | ६वी/अ |
| | कु. मृदा राजेंद्र पाडलेकर | ६वी/अ |
| | कु. ईश्वरी श्रीधर एरंडे | ६वी/अ |
| | कु. सान्वी सुनिल एरंडे | ६वी/क |
| द्वितीय | कु. संस्कृती कुलाबकर | ७वी/अ |
| | कु. सेजल इंगळे | ७वी/ब |

**इ. ८वी-९वी (वैयक्तिक)**

| **क्रमांक** | **विद्यार्थ्यांची नावे** | **इ./तु.** |
|---|---|---|
| प्रथम | कु. अथर्व चौधरी | ८वी/अ |
| द्वितीय | कु. सानवी वामन | ८वी/अ |
| तृतीय | कु. सान्वी कुटे | ८वी/ब |
| | कु. गणेश उबाळे | ९वी/अ |

**इ. ८वी-९वी (गटातून विजयी विद्यार्थी)**

| **क्रमांक** | **विद्यार्थ्यांची नावे** | **इ./तु.** |
|---|---|---|
| प्रथम | कु. श्रेयस ढेबे | ८वी/ब |
| | कु. चिन्मय घाणेकर | ८वी/ब |
| द्वितीय | कु. तनिष वाघमारे | ८वी/ब |
| | कु. नीरज ढोलम | ८वी/ब |

**कथाकथन**

शनिवार दि. ३१ ऑगस्ट २०२४ रोजी इ. १० वीच्या सर्व विद्यार्थ्यांसाठी कथाकथन हा उपक्रम मुख्याध्यापिका श्रीमती योगिनी पोतदार यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी बोधपर कथा मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेमध्ये सादर केल्या.

मुख्याध्यापिका श्रीमती योगिनी पोतदार यांनी कथाकथन कसे करावे? कोणकोणत्या मुद्द्यांचा यात विचार करावा? ते एका माळेत कसे गुंफावेत? तसेच सादरीकरण कसे असावे? याबद्दल अतिशय मोलाचे मार्गदर्शन केले व विद्यार्थ्यांचे कौतुकही केले.

कथाकथन उपक्रमासाठी मुख्याध्यापिका श्रीमती योगिनी पोतदार, उपमुख्याध्यापिका श्रीमती ज्योती देसाई, शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे अप्रतिम सूत्रसंचालन इ. १० वीच्या विद्यार्थिनी कु. समीक्षा नरवडे व कु. तन्वी चंदनशिवे यांनी केले. उपक्रमाचे आयोजन शिक्षक श्री. रमेश घाडगे, श्रीमती सुनिता वायकर व श्रीमती मीनल भोळे यांनी केले.

श्रवणीय अशा अभंग व भक्तिगीताने कार्यक्रमाची सांगता झाली. अतिशय सुंदर असे फलक लेखन सहा.शिक्षक श्री. अर्जुन मस्के यांनी केले.

### हिंदी दिवस

दि. १४ सप्टेंबर २०२४ रोजी सकाळी ८.०० ते ९.०० या वेळेत प्रशालेच्या आप्पासाहेब गरगटे सभागृहात 'हिंदी दिवस' साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी विद्याभवन सिनिअर कॉलेजचे प्रिन्सिपल श्री. अजयकुमार पाठक प्रमुख अतिथी म्हणून लाभले. प्रशालेच्या मुख्याध्यापिका श्रीमती योगिनी पोतदार, उपमुख्याध्यापिका श्रीमती ज्योती देसाई व विद्याभनव हायस्कूल नं. २ चे मुख्याध्यापक श्री. सुनिल पाटील या सर्वांची उपस्थिती होती.

या निमित्ताने खालीलप्रमाणे कार्यक्रम घेण्यात आले. कार्याक्रमाचे सूत्रसंचालन सानवी आव्हाड आणि संस्कृती सरगर या विद्यार्थिनींनी केले. इ. ८वी च्या विद्यार्थिनींनी मीरेचे पद गायिले. इ. १०वी ची विद्यार्थिनी जास्मीन इनामदार हिने हिंदी साहित्यिक श्री प्रेमचंदजी यांची माहिती सांगितली. इ. ६वी ची विद्यार्थिनी ईश्वरी एरंडे हिने हिंदी कविता गायन केले. सहा.शिक्षक श्री. पद्माकर शिंगटे यांनी कविता सादर केली. इ. ६वी ते ९वी च्या विद्यार्थिनी विविध कार्यक्रम सादर केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कविता गायन, आभार प्रदर्शन सहा.शिक्षक श्री. पद्माकर शिंगटे, सहा.शिक्षिका श्रीमती नंदिनी साके व श्रीमती जयश्री मोहिते यांनी केले.

## विद्याभवन माध्यमिक इंग्रजी

**कार्याध्यक्ष : श्री. राजेंद्र वि. बोऱ्हाडे**

**मुख्याध्यापक : श्री. सुनिल भालचंद्र पाटील**

### राखी स्पर्धा

दि. १७ ऑगस्ट २०२४ रोजी विद्याभवन हायस्कूल नं. २ मध्ये निसर्ग मंडळातर्फे आप्पासाहेब गरगटे सभागृहात राख्या तयार करण्याची स्पर्धा आणि प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. सदर प्रदर्शनाला विद्याभवन हायस्कूल माध्यमिक मराठी विभागाच्या मुख्याध्यापिका श्रीमती योगिनी पोतदार, मुख्याध्यापक श्री. सुनील पाटील, उपमुख्याध्यापिका श्रीमती लता नायर, समन्वयिका श्रीमती सरला नरेंद्रन्, शिक्षक व विद्यार्थ्यांनी भेट दिली. सर्व मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे कौतुक केले. स्पर्धेतील विजेत्या स्पर्धकांची नावे खालीलप्रमाणे :

| क्रमांक | विद्यार्थ्यांची नावे | इ./तु. |
|---|---|---|
| प्रथम | कु. सई संजय शिंदे | ६वी/क |
| द्वितीय | कु. समीक्षा संदीप गायकवाड | ५वी/क |
| तृतीय | कु. अथश्री प्रणव अहिरे | ६वी/अ |
| उत्तेजनार्थ | कु. अर्णव किरण फदाले | ५वी/ब |
| | कु. श्रेयस संतोष मोहिते | ५वी/क |
| | कु. कशिष प्रशांत भुजबळ | ६वी/क |

### मासिक पाळीविषयी जागरूकता

दि. २१ ऑगस्ट २०२४ रोजी विद्याभवन संकुल घाटकोपरच्या आप्पासाहेब गरगटे सभागृहात CACR NGO तर्फे विद्यार्थिनींचे सक्षमीकरण आणि मासिक पाळी आरोग्य याबाबत व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. श्रीमती सुवर्णा घाडगे, श्रीमती मोहा कामत, श्रीमती शीतल पाटील आणि श्रीमती भाग्यश्री व्यवहारे या व्याख्यात्यांनी इ. ६वी ते १०वी तील विद्यार्थिनींना पौगंडावस्थेत होणारे शारीरिक आणि मानसिक बदल याबद्दल मार्गदर्शन केले. पाळी दरम्यान सॅनिटरी पॅड्सचा वापर, त्याची योग्य विल्हेवाट आणि स्वच्छतेचे पालन याची माहिती देण्यात आली. तसेच hygiene and dignity kit चे वाटप करण्यात आले.

### हाऊस निवडणूक

दि. २८ ऑगस्ट २०२४ रोजी विद्याभवन नं. २ तर्फे आप्पासाहेब गरगटे सभागृहात सन्मान सोहळा साजरा करण्यात आला. पृथ्वी, जल, अग्नी, वायू या हाऊसच्या कॅप्टन, व्हाईस कॅप्टन या पदांकरिता डिजिटल पध्दतीने घेण्यात आलेल्या निवडणूकीतून सर्वाधिक मत प्राप्त विद्यार्थ्यांची वरील पदांसाठी निवड करण्यात आली. यांमधून प्रत्येक हाऊस करिता हाऊस लीडर निवडण्यात आले. या सर्व विद्यार्थ्यांचा सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आला. तसेच त्यांना २०२४-२५ या शैक्षणिक वर्षाकरिता कार्यकारिणी स्पष्ट केली गेली. सदर

कार्यक्रमात सर्व विद्यार्थी प्रतिनिधींनी आपापल्या हाऊससाठी जबाबदारी आणि निष्ठेने काम करून शाळेच्या प्रगतीचा आलेख आणखी उंचावू अशी शपथ घेतली. या कार्यक्रमासाठी विद्याभवन माध्यमिक मराठी विभागाच्या मुख्याध्यापिका श्रीमती योगिनी पोतदार, विद्याभवन हायस्कूल नं. २ चे मुख्याध्यापक श्री. सुनील पाटील, उपमुख्याध्यापिका श्रीमती लता नायर, समन्वयिका श्रीमती सरला नरेंद्रन् व शिक्षक उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरूवात दीपप्रज्वलनाने झाली. सर्व मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. तद्नंतर उत्सवमूर्तींना सन्मानार्थ पदसूचक बिल्ला आणि हाऊसच्या नावाने गौरविण्यात आले. मान्यवरांनी विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी मार्गदर्शन केले व शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहा.शिक्षिका श्रीमती संगीता मुंढे यांनी केले. तसेच सहा.शिक्षक श्री. दिलीप कणसे यांच्या आभारप्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

**आनंददायी उपक्रम**

शासनाच्या परिपत्रकानुसार विद्याभवन हायस्कूल नं. २ मध्ये दि. १० ऑगस्ट.२०२४ रोजी इ. ५वी ते ८वी च्या विद्यार्थ्यांसाठी आनंददायी शनिवार साजरा करण्यात आला.

**उपक्रम १** : योगाभ्यास आणि प्राणायाम. विद्यार्थ्यांच्या शारीरिक-मानसिक-बौध्दिक विकासाला पूरक असे योग प्रकार आणि प्राणायाम याबद्दल मार्गदर्शन व प्रात्यक्षिक घेण्यात आले.

**उपक्रम २** : वृत्तपत्र वाचन. राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय चालू घडामोडी, ऑलिम्पिक संदर्भातील बातम्या, राजकीय, शैक्षणिक खेळ, मनोरंजन इ. क्षेत्रातील बातम्यांचे वाचन करून त्यावर चर्चा करण्यात आली.

**उपक्रम ३** : कथाकथन. विविध बोधप्रद गोष्टी विद्यार्थ्यांनी वर्गात सादर केल्या त्यातून काय बोध घेता येईल यावर चर्चा केली.

**उपक्रम ४** : भाजी व फळे बाजार. विविध भाज्या आणि फळे यांना विशिष्ट रीतीने मांडून बाजाराची प्रतिकृती उभारण्यात आली. भाज्यांचे वजन करून ते योग्य दरात विकणे, हिशोब करणे, सुटे पैसे देणे, योग्य संवाद साधणे, इत्यादींचे प्रात्यक्षिक सादर करण्यात आले.

**उपक्रम ५** : गणितीय खेळ. मनोरंजनात्मक गणितीय कोडी, खेळ, स्पर्धा इ. कृती वर्गात घेण्यात आल्या.

**निष्पत्ती** : या उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास, सभाधीटपणा, मूल्यसंस्कार, गणितीय कौशल्ये, सामान्य ज्ञान, इत्यादी उद्दिष्टे साध्य झाली.

दि. १७ ऑगस्ट २०२४ रोजी आनंददायी शनिवार साजरा करण्यात आला.

**उपक्रम १** : राखी तयार करणे : विद्यार्थ्यांनी पर्यावरणस्नेही साहित्य वापरून विविध प्रकारच्या सुरेख राख्या तयार केल्या.

**उपक्रम २** : बँकेचे व्यवहार समजून घेणे. विद्यार्थ्यांनी वर्गात बँकेची प्रतिकृती तयार करून बँकेचे व्यवहार समजून घेतले. एटीएम मशीन, बचत खाते, कर्ज, पैसे deposit करणे, withdraw करणे, विविध फॉर्म भरणे इत्यादीचे प्रात्यक्षिक सादर केले.

**निष्पत्ती** : वरील उपक्रमांतून विद्यार्थ्यांमधील कल्पनाशक्तीचा विकास व कुटुंबाप्रती आदरभाव, निर्माण झाला. त्याचप्रमाणे आर्थिक साक्षरता, व्यवहारज्ञान, समस्या निराकरण व कौशल्याचा विकास इत्यादी उद्दिष्टे साध्य झाली. विद्यार्थ्यांनी आनंदाने दोन्ही उपक्रमात सहभाग घेतला.

दि. ३१ ऑगस्ट २०२४ रोजी तिसरा आनंददायी शनिवार साजरा करण्यात आला.

**उपक्रम १** : चिकण मातीच्या सहाय्याने गणेश मूर्ती तयार करणे. विद्यार्थ्यांनी विविध प्रकारच्या सुरेख मूर्ती तयार करून त्यांना आवश्यक ते रंगकाम केले.

**उपक्रम २** : मखर तयार करणे. पर्यावरण स्नेही साहित्याचा वापर करून विद्यार्थ्यांनी गणेश आगमनाची पूर्वतयारी म्हणून सुरेख मखर तयार केले.

**निष्पत्ती** : या उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमधील सर्जनशीलतेला वाव मिळाला. पारंपरिकता जपत आधुनिक कल्पनांचा समावेश करून विद्यार्थ्यांनी हे उपक्रम आनंदी वातावरणात पार पाडले.

**मखर स्पर्धा**

दि. ३१ ऑगस्ट २०२४ रोजी नेचर क्लबतर्फे पर्यावरणपूरक मखर बनवण्याची स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत इ. ५वी ते ८वी च्या सर्व विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला. विद्याभवन हायस्कूल नं. २ चे कलाशिक्षक श्री. संदीप तावडे व श्री. सुहास गरदडे यांनी परिक्षण केले. विद्यार्थ्यांनी सुंदर इको फ्रेंडली मखरांचे प्रदर्शन केले. मुख्याध्यापक श्री. सुनील पाटील, उपमुख्याध्यापिका श्रीमती लता नायर व इतर शिक्षकांनी भेट देऊन विद्यार्थ्यांचे कौतुक केले. विद्यार्थ्यांनी निर्माण केलेल्या मखरातून त्यांची सर्जनशीलता मंत्रमुग्ध करणारी होती.

**एकपात्री अभिनय स्पर्धा**

दि. २ सप्टेंबर २०२४ रोजी विद्याभवन हायस्कूल नं. २ प्रशालेत मराठी वाङ्मय मंडळ आयोजित एकपात्री अभिनय स्पर्धा घेण्यात आली होती. सदर स्पर्धेत विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. इ. ५वी ते ७वी आणि इ. ८वी ते १०वी अशा दोन गटांमध्ये ही स्पर्धा होती. विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट अभिनय केला. स्पर्धेसाठी सहा. शिक्षिका श्रीमती मीना गायकवाड, श्रीमती सुप्रिया महाकाल, श्रीमती सुजाता महादर व श्रीमती हर्षदा गवळी या शिक्षकांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. स्पर्धेत परिक्षणाचे महत्त्वाचे काम सहा.शिक्षिका श्रीमती मीना गायकवाड व श्रीमती लीना शिंदे यांनी केले. स्पर्धेतील विजयी विद्यार्थी पुढीलप्रमाणे

**गट ५वी ते ७वी**

| क्रमांक | विद्यार्थ्यांची नावे | इ./तु. |
|---|---|---|
| प्रथम | कु. संस्कृती संतोष देवरूखकर | ६वी/अ |
| द्वितीय | कु. शौर्य गणेश गायकर | ५वी/अ |
| तृतीय | कु. श्रेया सचिन धोंगडे | ५वी/क |

**गट ८वी ते १०वी**

| क्रमांक | विद्यार्थ्यांची नावे | इ./तु. |
|---|---|---|
| प्रथम | कु. तनिष्का संतोष साबळे | ९वी/ब |
| द्वितीय | कु. अर्चना सुनिल सिंह | १०वी/एम |
| तृतीय | कु. पार्थ राजेश राणे | १०वी/ब |

**सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व त्यांच्या मार्गदर्शक शिक्षकांचे संस्थेच्यावतीने हार्दिक अभिनंदन आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा!** ***

**❊ विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, घाटकोपर शाखा, मुंबई ❊**



**दि. ५ सप्टेंबर २०२४ पूर्व प्राथमिक सेमी इंग्रजी विभागाच्या पर्यवेक्षिका श्रीमती सिध्दी साळवी यांच्या सेवापूर्ती समारंभ प्रसंगी उपस्थित मुख्याध्यापिका, समन्वयिका आणि शिक्षिका**

# डॉ. काकासाहेब देवधर इंग्लिश स्कूल,म्हसरूळ–नाशिक

**कार्यवाह : श्री. संजय गुंजाळ**
**मुख्याध्यापिका : श्रीमती भारती पाटील**

## माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विभाग

### म्युझियम ऑन व्हिल

ओरिगामी कला आणि संस्कृतीमधील करिअरची संधी जाणून घेण्यासाठी गतवर्षीप्रमाणे इयत्ता ८वी ते १२वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांनी शाळेच्या प्रांगणात ''म्युझियम ऑन व्हिल्स''ला प्रत्यक्ष भेट दिली.

आधुनिक काळात आपला इतिहास विस्मृतीत जाऊ नये इतिहासात घडलेल्या घडामोडीशी आपली नाळ जोडलेली रहावी म्हणून या क्षेत्र भेटीचे आयोजन करण्यात आले. म्युझियम ऑन व्हिल्स मध्ये ओरिगामी कलेचे प्रदर्शन होते. वारसा संवर्धन आणि उपयोजित इतिहासाचे ज्ञान मिळावे या उद्देशाने संग्रहालयाच्या प्राध्यापकांनी इ. १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी कला आणि संस्कृतीतील करियर याविषयी माहिती पूर्ण सत्राचे आयोजन केले होते.

### स्वातंत्र्य दिनाच्या उत्सवानिमित्त देशभक्तीपर समूहगीत स्पर्धा

स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने देशभक्तीपर समूहगीत स्पर्धेचे आयोजन करून सांस्कृतिक एकतेचा संदेश देण्यात आला. या स्पर्धेचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये सांघिक कार्य व सांस्कृतिक प्रतिभा यांची वृद्धी करणे आणि स्वातंत्र्य दिनाच्या उत्सवात भाषिक व संगीतात्मक कौशल्याचे प्रदर्शन करणे हा होता. बंगाली, संस्कृत, मराठी आणि हिंदी भाषांमध्ये सादर केलेल्या गीतांसह रेड, येलो, ग्रीन आणि ब्ल्यू हाऊसच्या स्पर्धकांनी आपल्या उत्कृष्ट प्रदर्शनाने उपस्थितांची मनं जिंकली.

संगीत विशारदांचा समावेश असलेल्या परीक्षकांच्या समितीने प्रत्येक हाऊसच्या योगदानाचे मूल्यांकन केले. देशभक्ती आणि एकात्मतेच्या भावनेने प्रेरित होऊन, या स्पर्धेत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांच्या उत्कृष्ट योगदानाची दखल घेऊन निकाल जाहीर करण्यात आले. सहभागी विद्यार्थ्यांनी त्यांच्या समूहगीताच्या माध्यमातून स्वातंत्र्य दिनाच्या दिवशी एकतेचा आणि देशभक्तीचा संदेश प्रभावीपणे प्रसारित केला.

### राष्ट्रीय अंतराळ दिन

आकाश दर्शन आणि विज्ञानाची उत्साहवर्धक अनुभूती अनुभवण्याच्या उद्देशाने राष्ट्रीय अंतराळ दिनाच्या निमित्ताने, '८ स्कूप्स ऑफ मिल्कीवे' या गॅलेक्सी डोम मधून अंतराळाचे अद्‌भुत दर्शन आयोजित करण्यात आले. इ. ८वी ते १२वीच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित केलेल्या या आकाश दर्शनाने विज्ञानाची आवड निर्माण करण्याचा तसेच अंतराळ विज्ञानाचे ज्ञान समृध्द करण्याचा उद्देश साधला.

या विशेष कार्यक्रमात, विद्यार्थ्यांना तारे, ग्रह, नक्षत्र आणि विविध खगोलीय वस्तूंच्या जीवन चक्राविषयी स्लाइड शो द्वारे माहिती देण्यात आली. रात्रीच्या अंधारात आकाशात लेझर बीमद्वारे तारे, ध्रुवतारा आणि अन्य विविध क्षेत्रांचे दर्शन घडवण्यात आले.

अंतराळातील सौंदर्य पाहण्यासाठी विद्यार्थी अत्यंत उत्साही होते. त्यांना गुरू ग्रह, चंद्र, आणि पृथ्वीचे निरीक्षण करण्याची अद्‌भुत संधी मिळाली. या आकाश दर्शनाने विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाविषयी गाढ आकर्षण निर्माण केले आणि त्यांच्या अंतराळ विज्ञानाच्या ज्ञानात भर घातली.

### विशाखा समितीची स्थापना

किशोरवयीन विद्यार्थिनींसाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल. विशाखा समितीची स्थापना विद्यार्थिनींना सक्षमीकरणाच्या दृष्टीने मानसिक आणि शारीरिक बळ

देण्यासाठी करण्यात आली आहे. या समितीचे उद्दिष्ट किशोरवयीन मुलींच्या समस्या आणि त्यांच्या उपाययोजना यावर मार्गदर्शन करणे आणि त्यांच्या वैयक्तिक स्वच्छतेच्या सवयी, पौष्टिक आहार इत्यादींवर लक्ष केंद्रित करणे आहे. या संदर्भात, प्रसिद्ध समूपदेशक श्रीमती नयना देशमुख (सहव्यवस्थापक - विवेकानंद केंद्र कन्याकुमारी देवगिरी विभाग) यांचे मार्गदर्शन लाभले. श्रीमती नयना देशमुख यांनी किशोरवयीन मुलींच्या समस्यांचा अभ्यास केला आणि त्या समस्यांवरील उपाययोजना तसेच त्यांचे मानसिक परिणाम याविषयी सखोल माहिती दिली.

मुख्याध्यापिकांनी विशाखा समितीची रचना, कार्य आणि उद्दिष्टे अत्यंत स्पष्टपणे सांगितली, ज्यामुळे विद्यार्थिनींना या समितीच्या उद्दिष्टांबद्दल आणि त्यांच्या कर्तव्यातील महत्त्वाच्या बाबींच्या कळकळीचा संदेश प्राप्त झाला. या समितीच्या स्थापनेमुळे विद्यार्थिनींच्या विकासाला एक नवीन दिशा मिळाली आहे, जी त्यांना त्यांच्या भविष्याच्या पायऱ्या चढण्यास मदत करेल.

**शिक्षण महर्षी डॉ.अण्णासाहेब खैर स्मृतिदिन**

दि. २९ ऑगस्ट २०२४ रोजी डॉ. अण्णासाहेब खैर यांचा स्मृतिदिनानिमित्त मुख्याध्यापिका श्रीमती भारती पाटील यांच्या हस्ते डॉ. अण्णासाहेब खैर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून पूजन करण्यात आले. तसेच डॉ. अण्णासाहेब खैर यांच्या जीवन कार्याची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. ***

## श्रीराम सदाशिव धामणकर वाणिज्य, विज्ञान आणि कला महाविद्यालय, म्हसरूळ शाखा, नाशिक

**कार्यवाह : श्री. संजय नि. गुंजाळ**
**प्राचार्य : डॉ. एस. जी. वाकचौरे**

**एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन**

* दि. ३० ऑगस्ट २०२४ रोजी वाणिज्य विभागातर्फे बौद्धिक संपदा हक्क या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेचे उद्‌घाटन डॉ. संदीप टिळे व प्राचार्य डॉ. संजय वाकचौरे यांच्या हस्ते करण्यात आले. प्रमुख व्याख्याते डॉ. संजय टिळे यांनी बौद्धिक हक्क संपदा या विषयाची संकल्पना, या संकल्पनेचा उगम, इतिहास, शोध, बौद्धिक संकल्पनेचे प्रकार, व्यापारी चिन्ह, लेखन हक्क, नावलौकिक, अशा विविध बौद्धिक संपदा विषयी उपस्थितांना माहिती दिली. तसेच विद्यार्थी नवनवीन बौद्धिक संकल्पनांचा शोध कसा लावू शकतात, याविषयी मार्गदर्शन केले.

प्राचार्य डॉ. संजय वाकचौरे यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना बौद्धिक संपदा हक्क या संकल्पनेचे महत्त्व सांगितले.

* दि. ३१ ऑगस्ट २०२४ रोजी महिलांसाठीचे कायदे, जाणीव आणि जागृती या विषयावर महिला तक्रार निवारण समिती अंतर्गत कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. कार्यशाळेचे उद्‌घाटन कायदे तज्ज्ञ श्रीमती पुष्पा ढवळे व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय वाकचौरे यांच्या हस्ते झाले. व्याख्यात्या श्रीमती पुष्पा ढवळे यांनी महिलांसाठी असणारे कायदे, नवीन आलेले कायदे, त्याची अंबलबजावणी, दामिनी पथक, निर्भया पथक, मदतकार्य, याविषयी माहिती देत मार्गदर्शन केले. यावेळी उपस्थित विद्यार्थिनींनी कायद्याविषयी विविध प्रश्न विचारले. त्यांच्या शंकांचे निरसन कायदे तज्ज्ञ श्रीमती ढवळे यांनी विविध उदाहरणे देऊन केले.

कार्यशाळांसाठी कार्यवाह श्री. संजय गुंजाळ आणि प्राचार्य डॉ. संजय वाकचौरे यांचे मार्गदर्शन लाभले.

***

# डॉ. काकासाहेब देवधर इंग्लिश स्कूल,म्हसरूळ–नाशिक

**कार्यवाह : श्री. संजय गुंजाळ**
**मुख्याध्यापिका : सौ. मनीषा साठे**

## पूर्व प्राथमिक विभाग

### रेड कलर डे चे आयोजन

दि. १२ जुलै २०२४ रोजी 'रेड कलर डे' आयोजित करण्यात आला होता. रंगांचा हा उत्सव साजरा करण्यासाठी आपल्या शाळेत दर महिन्याला विविध रंगांचा दिवस साजरा केला जाणार आहे. यामुळे विद्यार्थ्यांना रंगांच्या दुनियेची ओळख करून देण्यात येईल. जुलै महिन्यात लाल रंगाचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून देण्यात आले. लाल रंग प्रेम, संवेदनशीलता, आनंद, सामर्थ्य, नेतृत्व या अर्थांशी संबंधित आहे. लाल रंगाच्या पोशाखात चिमुकले विद्यार्थी खूपच आकर्षक दिसत होते. मुख्याध्यापिका सौ. मनीषा साठे यांनी विद्यार्थ्यांना लाल रंगाचे महत्त्व पटवून दिले.

### आषाढी एकादशी उत्साहात साजरी

दि. १६ जुलै २०२४ रोजी आषाढी एकादशी मोठ्या उत्साहात साजरी झाली. विद्यार्थी पारंपरिक वेशात वारकरी बनून आले होते. पालखी सोहळा आयोजित करण्यात आला होता. तसेच पुस्तक दिंडी पण काढण्यात आली. टाळ व मृदंगाच्या गजरात वारकरी विद्यार्थ्यांनी 'विठ्ठल विठ्ठल जय हरी विठ्ठल' या नाम घोषात विद्यार्थ्यांनी पारंपरिक दिवस साजरा केला.

### मान्सून उत्साहात साजरा

दि.१९ जुलै २०२४ रोजी चिमुकल्यांनी मान्सून उत्साहात साजरा केला. चिमुकल्यांनी रंगीबेरंगी रेनकोट परिधान करून आणि गोंडस छत्र्या हातात धरून पावसाळी वातावरण केले. विद्यार्थ्यांनी कागदी बेडूक, बोटी, छत्री, इंद्रधनुष्य बनवले आणि पावसाळी वातावरणात फोटो काढले. नर्सरीमधील चिमुकल्यांनी वेगवेगळ्या उपक्रमांची योजना आखली होती. त्यांनी कागदी होड्या बनवल्या आणि त्यांच्याशी खेळून त्या पाण्यात सोडल्या. कार्यवाह श्री. संजय गुंजाळ यांनी सर्वांना मान्सूनच्या शुभेच्छा दिल्या. मुख्याध्यापिका सौ. मनीषा साठे यांनी विद्यार्थ्यांना हवामानातील बदल आणि पावसाळ्याचे महत्त्व समजावून सांगितले. तसेच शिक्षिका सौ. शुभा थोरात यांनी विद्यार्थ्यांना 'झाडे लावा, झाडे जगवा' याबद्दल माहिती दिली. तसेच पाणी जपून वापरावे हे पटवून दिले.

### गुरूपौर्णिमा

दि. २२ जुलै २०२४ रोजी गुरूपौर्णिमा साजरी करण्यात आली. आपल्या आयुष्यात गुरूचे स्थान किती श्रेष्ठ आहे हे विद्यार्थ्यांना पटवून देण्यात आले. आपले प्रथम गुरू हे आई वडील आहेत, हे सांगण्यात आले. विद्यार्थ्यांनी आपापल्या शिक्षकांना पुष्पगुच्छ देऊन त्यांना अभिवादन केले. शिक्षिका गीता तोडी यांनी गुरूचे महत्त्व विद्यार्थ्यांना सांगितले.

### फॅन्सी ड्रेस स्पर्धेचे आयोजन

दि. १४ ऑगस्ट २०२४ रोजी विद्यार्थ्यांसाठी फॅन्सी ड्रेस स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. विद्यार्थ्यांमध्ये संज्ञानात्मक कौशल्ये व आत्मविश्वास विकसित करणे हा या स्पर्धेचा मुख्य उद्देश होता.

यावेळी लहान विद्यार्थ्यांनी स्वतःला वेगवेगळ्या पात्रांमध्ये सादर केले. त्यांच्या रंगीबेरंगी पोशाखांनी सर्वांना रोमांचित केले. नर्सरीसाठी 'रोपवाटिका', छोट्या गटासाठी 'मदतनीस' तर मोठ्या गटासाठी 'स्वतंत्रता सेनानी' हे विषय देण्यात आले होते. या स्पर्धेमुळे त्यांना सर्जनशीलता वाढवण्याची आणि त्यांची प्रतिभा व्यक्त करण्याची संधी मिळाली.

कार्यवाह श्री. संजय गुंजाळ यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. सर्व विद्यार्थ्यांना शुभेच्छा देत त्यांना पुढील स्पर्धेत सहभागी होण्यासाठी प्रोत्साहन दिले.

या कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या सौ. केतकी साठे यांचेकडून विद्यार्थ्यांना भविष्यात अशा स्पर्धांमध्ये सहभागी होण्यासाठी प्रेरणा मिळाली. सर्व उपस्थितांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता झाली.

## कृष्ण जन्माष्टमी उत्साहात साजरी

भगवान श्रीकृष्णाच्या जन्मानिमित्त आपल्या देशात सर्वत्र मोठ्या उत्साहात जन्माष्टमी साजरी केली जाते. दि. २३ ऑगस्ट २०२४ रोजी कृष्ण जन्माष्टमी उत्साहात साजरी करण्यात आली. सर्व विद्यार्थ्यांनी राधा व कृष्णाची वेशभूषा केली होती. सर्व बाळगोपाळ विद्यार्थ्यांनी दहीहंडी फोडण्याचा आनंद लुटला. त्यांनतर दहीकाला - हंडीतील खाऊ खाल्ला. याप्रसंगी भगवान श्रीकृष्णाच्या जन्माचा उत्सव साजरा करण्यासाठी श्रीकृष्णाची एक छोटीशी सुंदर मूर्ती सजवलेल्या झुल्यात ठेवण्यात आली होती. सर्व परिसर सजवण्यात आला होता. सुरेल गाण्यांच्या तालावर बालचमू नाचत होता. मुख्याध्यापिका सौ. मनीषा साठे यांनी पूजन करून विद्यार्थ्यांना स्वत:मध्ये नैतिक व सामाजिक मूल्ये आत्मसात करण्याबाबत प्रोत्साहन दिले. सर्व शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी एकमेकांना जन्माष्टमीच्या शुभेच्छा दिल्या. तसेच कार्यवाह श्री. संजय गुंजाळ यांनीही सर्वांना जन्माष्टमीच्या शुभेच्छा दिल्या.

## पिवळा रंग उत्सव

दि. ३० ऑगस्ट २०२४ रोजी विभागात पिवळा रंगोत्सव साजरा करण्यात आला. पिवळ्या रंगाचे सकारात्मक वैशिष्ट्य प्रसारित करण्याच्या उद्देशाने या उत्सवात विद्यार्थ्यांनी त्यांच्या आवडत्या पिवळ्या पोशाखात विविध वस्तूंचे सादरीकरण करून पिवळ्या रंगाचा उत्साही अनुभव निर्माण केला. यावेळी पिवळ्या पोशाखातील मुले आणि शिक्षक यांतील आशावाद दिसून आला. तसेच ज्ञान, आनंद, ऊर्जा आणि आनंद अशा भावनांचा परिपोष होताना यावेळी दिसला. एकूणच चित्र आणि वातावरण अतिशय आशादायक तसेच भविष्यातील तरुणांच्या मनातील सर्जनशील विचारांचे द्योतक प्रतिक वाटले. पिवळा दिवस साजरा करण्यामागचा उद्देश मुलांना पिवळ्या रंगाचे महत्त्व पटवून देणे हा होता. यावेळी कार्यवाह श्री. संजय गुंजाळ आणि मुख्याध्यापिका सौ. मनीषा साठे यांनी चिमुकल्यांचे कौतुक केले आणि शिक्षकांचे मन:पूर्वक अभिनंदन केले.

***

*** डॉ. काकासाहेब देवधर इंग्लिश स्कूल, म्हसरूळ शाखा, नाशिक ***



दि. २३ ऑगस्ट २०२४ रोजी
कृष्ण जन्माष्टमी निमित्त
दहीहंडी फोडण्याचा आनंद लुटताना
राधा - कृष्णाची वेशभूषा केलेले बाळगोपाळ




दि. ३० ऑगस्ट २०२४ रोजी
पिवळा रंगोत्सव साजरा करताना
पिवळ्या रंगाचे कपडे परिधान
करुन पिवळ्या रंगाच्या वस्तू
दाखवताना विद्यार्थी

# डॉ. काकासाहेब देवधर इंग्लिश स्कूल,म्हसरूळ–नाशिक

**कार्यवाह : श्री. संजय गुंजाळ**
**मुख्याध्यापिका : सौ. प्रतिमा वैद्य**

## प्राथमिक विभाग

### लोकमान्य टिळक पुण्यतिथी

दि. १ ऑगस्ट २०२४ रोजी लोकमान्य टिळक पुण्यतिथीनिमित्त मुख्याध्यापिका सौ. प्रतिमा वैद्य यांनी लोकमान्य टिळकांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण केला. उपशिक्षिका सौ. सविता ननावरे यांनी लोकमान्य टिळक यांच्या कार्याची माहिती यावेळी दिली.

### लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती

दि. १ ऑगस्ट २०२४ रोजी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी करण्यात आली. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या कार्याची माहिती सौ. रुपाली चव्हाण यांनी दिली.

### क्रांतिसिंह नाना पाटील जयंती

दि. ३ ऑगस्ट २०२४ रोजी क्रांतिसिंह नाना पाटील यांची जयंती साजरी करण्यात आली. उपशिक्षिका सौ. योगिता कोठावदे यांनी क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या कार्याची माहिती सांगितली.

### परिवहन समितीची बैठक

दि. ६ ऑगस्ट २०२४ रोजी परिवहन समितीची बैठक घेण्यात आली. या बैठकीसाठी परिवहन अधिकारी कु. देविका गुंजाळ उपस्थित होत्या. त्यांनी बस चालक व सर्व व्हॅन चालक यांना मार्गदर्शनपर सूचना दिल्या. तसेच विद्यार्थी सुरक्षा उपाय योजना बाबत सविस्तर सांगितले. या बैठकीस मुख्याध्यापिका सौ. प्रतिमा वैद्य, पालक शिक्षक संघाचे सदस्य, पालक तसेच वाहन चालक उपस्थित होते.

### अभिनंदनीय

✻ दि. ३ आणि ४ ऑगस्ट २०२४ रोजी सेवन्थ मिशन २०२८ अंतर्गत मीनाताई ठाकरे स्टेडियममध्ये तलवार बाजी स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत विद्यार्थी कु. श्रीराम निकम याने कांस्यपदक पटकावले.

✻ दि. ४ ऑगस्ट २०२४ रोजी मीनाताई ठाकरे स्टेडियम येथे एरोबिक्स स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत डॉ. काकासाहेब देवधर इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले. यशस्वी विद्यार्थ्यांची नावे पुढीलप्रमाणे

| विद्यार्थ्याचे नाव | इयत्ता | पदक |
|---|---|---|
| कु. जान्हवी धिवरे | ६ वी | २ सुवर्णपदके |
| कु. मृण्मयी दीक्षित | ५ वी | १ सुवर्णपदक, १ रौप्यपदक |
| कु. आराध्या दिवेकर | ५ वी | १ सुवर्णपदक |
| कु. कस्तुरी खैरनार | ५ वी | १ कांस्यपदक |
| कु. विधी अय्यर | ५ वी | १ सुवर्णपदक |
| कु. ऋग्वेदा घोलप | ५ वी | १ सुवर्णपदक |

### कराटे स्पर्धेतील यश

भुजबळ चषक २०२४ कराटे स्पर्धेत इ. ६ वीची विद्यार्थिनी कु. गार्गी कोडे हिने रौप्यपदक मिळविले.

### मराठी वक्तृत्व स्पर्धा

दि. ७ ऑगस्ट २०२४ रोजी शाळेत मराठी वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. स्पर्धेचे विषय पुढीलप्रमाणे होते.

| | |
|---|---|
| इयत्ता ५ वी | १. पुस्तकाची आत्मकथा |
| | २. साक्षरतेचे महत्त्व |
| इयत्ता ६ वी | १. प्लॅस्टिक मुक्त भारत |
| | २. पर्यावरण संवर्धन : काळाची गरज |
| इयत्ता ७ वी | १. शेतकरी संपावर गेला तर |
| | २. नदीची आत्मकथा |

या स्पर्धेचे परीक्षण माता-पालक संघाच्या सदस्या सौ. मनीषा संकोपाल यांनी केले. स्पर्धेचे विजेते पुढीलप्रमाणे

**इयत्ता ४ थी व इयत्ता ५ वी गट**

| विद्यार्थ्याचे नाव | इयत्ता | हाऊस | क्रमांक |
|---|---|---|---|
| कु. हंसिका सोनवणे | ५ वी | पारिजात | प्रथम |
| कु. शिवानी चव्हाण | ४ थी | रुबी | द्वितीय |
| कु. देवांश शेटे | ४ थी | ओपल | तृतीय |
| **इयत्ता ६ वी व इयत्ता ७ वी** | | | |
| कु. काव्या पिंगळे | ६ वी | अग्नी | प्रथम |
| कु. अद्विका पाटील | ७ वी | पृथ्वी | द्वितीय |
| कु. श्रेयस भिरूड | ६ वी | ब्रम्होस | तृतीय |

**सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे आणि त्यांच्या मार्गदर्शक शिक्षकांचे संस्थेच्यावतीने हार्दिक अभिनंदन !**

### हिरोशिमा दिवस

दि. ६ ऑगस्ट २०२४ रोजी हिरोशिमा दिवस म्हणजेच अमेरिकेने दुसऱ्या महायुद्धात जपानमधील हिरोशिमा या शहरावर अणुबॉम्ब टाकला तो दिवस. अणुबॉम्बद्वारा होणारा विध्वंस जगाने या दिवशी पाहिला. उपशिक्षिका सौ. दर्शना सोनवणे यांनी त्या बाबत माहिती सांगितली.

### रवींद्रनाथ टागोर पुण्यतिथी

दि. ७ ऑगस्ट २०२४ रोजी नोबेल पुरस्कार विजेते सुप्रसिध्द कवी, नाटककार, कथाकार रवींद्रनाथ टागोर यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली. शिक्षिका सौ. रुपाली खरोटे यांनी टागोरांच्या कार्याची माहिती सांगितली.

### नागासाकी दिन

दि. ९ ऑगस्ट २०२४ रोजी नागासाकी दिन साजरा करण्यात आला. या दिवशी झालेला विध्वंस पाहता, अशा घातक परिणामांना पुन्हा सामोरे जावे लागू नये, तसेच जगात शांतता प्रस्थापित व्हावी, म्हणून हा स्मृतिदिन साजरा केला जातो. शिक्षिका सौ. पूजा गांगुर्डे यांनी याबद्दल माहिती सांगितली.

### क्रांतिदिन

दि. ९ ऑगस्ट २०२४ रोजी 'छोडो भारत' 'चले जाव' ही चळवळ सुरू झाली. त्याची स्मृती म्हणून हा दिवस क्रांतिदिन म्हणून साजरा करण्यात येतो. शिक्षिका सौ. योगिता कोठावदे यांनी विद्यार्थ्यांना क्रांतिदिनाबद्दल माहिती सांगितली.

### आदिवासी दिन

दि. ९ ऑगस्ट २०२४ जागतिक आदिवासी दिन साजरा करण्यात येतो. या वर्षी शाळेतल्या वेगवेगळ्या वर्गांसाठी विविध उपक्रम राबविण्यात आले. ते पुढीलप्रमाणे,

| गट | विषय |
|---|---|
| इ. १ ली व इ. २ री | आदिवासी वेशभूषा |
| इ. ३ री व इ ४ थी | आदिवासी रहिवास या विषयावर आधारित भाषण |

इ. ५ वी - आदिवासी वाद्य प्रकार व माहिती
इ. ६ वी - आदिवासी पोषण आहार व माहिती
इ. ७ वी - वारली रंगकाम

विद्यार्थ्यांनी अतिशय उत्साहाने या उपक्रमात सहभाग नोंदवला.

### विद्यार्थी प्रतिनिधी पदग्रहण सोहळा

दि. ८ ऑगस्ट २०२४ रोजी पदग्रहण सोहळा साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या मुख्याध्यापिका श्रीमती भारती पाटील यांनी विद्यार्थ्यांना झेंडा व बॅच दिला. तसेच विद्यार्थी प्रतिनिधी, उपप्रतिनिधी यांचा शपथग्रहण सोहळा पार पडला. नवीन विद्यार्थी प्रतिनिधी मंडळ पुढीलप्रमाणे,

कु. ओम चव्हाण : विद्यार्थी प्रतिनिधी
कु. समृद्धी मोराडे : विद्यार्थिनी प्रतिनिधी
कु. आराध्य लहामगे, कु. देव खर्डे, कु. रोनक पाटील
कु. अस्मी बाग, कु. समीक्षा मगर, कु. निशांत जोशी

### ग्रंथालय दिवस

दि. १२ ऑगस्ट २०२४ रोजी भारतीय ग्रंथालय चळवळीचे जनक डॉ. एस. आर. रंगनाथन जयंतीनिमित्त राष्ट्रीय ग्रंथालय दिन साजरा करण्यात येतो. या दिनाची माहिती ग्रंथपाल श्रीमती संगीता खोडके यांनी विद्यार्थ्यांना सांगितली. वाचन आपणास कसे समृद्ध करते, या बद्दलची माहिती दिली.

## स्वातंत्र्य दिन

दि. १५ ऑगस्ट रोजी स्वातंत्र्यदिन अतिशय उत्साहात साजरा करण्यात आला. या वर्षीची स्वातंत्र्य दिनाची संकल्पना 'विकसित भारत' ही होती. भारताला स्वातंत्र्य मिळून ७७ वर्ष पूर्ण झाली, तर ७८ व्या वर्षात पदार्पण झाले.

स्वातंत्र्यदिनाची सुरूवात ध्वजारोहणाने झाली. कार्यवाह श्री. संजय गुंजाळ यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. त्यानंतर ध्वजाला मानवंदना देऊन राष्ट्रगीत, झेंडागीत व महाराष्ट्र गीत झाले.

प्राथमिक व माध्यमिक विभागातील विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीत गायले. पूर्व प्राथमिक विभागातील विद्यार्थिनी कु. प्रियांशी देवरे, प्राथमिक विभागातील विद्यार्थिनी कु. प्राची वाघेरे इ. ४ थी, व विद्यार्थी कु. अद्वैत वडजे, इ. ५ वी यांनी स्वातंत्र्याविषयी तसेच 'विकसित भारत' या संकल्पनेच्या पूर्ततेबद्दल मनोगत व्यक्त केले. धामणकर महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींनी देशभक्तीपर गीतावर नृत्य सादर केले. अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या कु. पार्थ सावळे याने स्वरचित कविता सादर केली. कु. अमृता डहाळे हिने देशभक्तीपर गीत सादर केले. पूर्व प्राथमिक विभागाच्या विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीतावर नृत्य सादर केले. त्यानंतर सर्वांनी गोदासंवर्धनाची शपथ घेतली.

कार्यवाह श्री. संजय गुंजाळ, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सौ. प्रतिमा वैद्य, माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका श्रीमती भारती पाटील, अभियांत्रिकी व व्यवस्थापन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मनोज भालेराव, धामणकर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय वाकचौरे, शिक्षण शास्त्र व संशोधन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरेश पाटील तसेच सर्व विभागातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. वैशाली मुंदाणकर यांनी केले.

## गोपाळकाला

दि. २६ ऑगस्ट २०२४ रोजी श्रीकृष्णजयंती आणि २७ ऑगस्टला गोपाळकाला साजरा करण्यात आला. मुख्याध्यापिका सौ. प्रतिमा वैद्य यांनी श्रीकृष्णाची पूजा करून फोटोला पुष्पहार घातला. शिक्षिका सौ. प्रमिला उदार यांनी विद्यार्थ्यांना गोकुळाष्टमीची माहिती सांगितली.

## राखी बनविण्याचा उपक्रम

दि. १७ ऑगस्ट २०२४ रोजी राखी बनविण्याचा उपक्रम राबविण्यात आला. इ. १ ली ते इ. ७ वी च्या विद्यार्थ्यांनी सुंदर राख्या बनविल्या.

## राष्ट्रीय क्रीडा दिन

दि. २९ ऑगस्ट २०२४ रोजी मेजर ध्यानचंद यांचा जन्मदिवस राष्ट्रीय क्रीडादिन म्हणून साजरा करण्यात येतो. शाळेचे क्रीडा शिक्षक व वर्गशिक्षकांनी विद्यार्थ्यांचे विविध खेळ घेतले. क्रीडा शिक्षक श्री. विजय साळवे यांनी क्रीडा दिनाबद्दल माहिती सांगितली.

## अण्णासाहेब खैर पुण्यतिथी

शिक्षणमहर्षी कै. डॉ. ग. श्री. तथा अण्णासाहेब खैर पुण्यतिथीनिमित्त मुख्याध्यापिका सौ. प्रतिमा वैद्य यांनी कै. अण्णासाहेब खैर यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून पूजन केले. उपशिक्षिका सौ. निशिगंधा सोमवंशी यांनी विद्यार्थ्यांना त्यांच्या कार्याची माहिती दिली.

## देशभक्तीपर गीत स्पर्धा

दि. ३१ ऑगस्ट २०२४ रोजी देशभक्तीपर समूहगीत स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. इ. ४ थी ते इ. ७ वीच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. दि. ३१ ऑगस्ट २०२४ रोजी शाडू मातीपासून गणेशमूर्ती बनविण्याचे प्रात्यक्षिक कलाशिक्षिका सौ. नेहा गर्गे व सौ. सोनल अमृतकर यांनी इ. ५ वी ते ७ वीच्या विद्यार्थ्यांना दाखविले. विद्यार्थ्यांनी सुबक मूर्ती बनविल्या.

***

## ⁕ डॉ. काकासाहेब देवधर इंग्लिश स्कूल, म्हसरूळ शाखा, नाशिक ⁕



दि. ६ ऑगस्ट २०२४ रोजी परिवहन समितीच्या बैठकीस उपस्थित परिवहन अधिकारी कु. देविका गुंजाळ यांचा सत्कार करताना माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका श्रीमती पाटील समवेत प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सौ. प्रतिमा वैद्य



ए रोबिक्स स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थिनी कु. जान्हवी धिवरे, कु. मृण्मयी दीक्षित आणि कु. आराध्या दिवेकर



दि. ८ ऑगस्ट २०२४ विद्यार्थी प्रतिनिधी पदग्रहण सोहळा प्रसंगी नवनिर्वाचित विद्यार्थी प्रतिनिधी

## ⁕ विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, घाटकोपर शाखा, मुंबई ⁕



शालेय गणपती विर्सजनानिमित्त पवई येथे लेझीम खेळणाऱ्या विद्याभवन माध्यमिक मराठी विभागाच्या विद्यार्थिनी ↑



→ राखी स्पर्धेत सहभागी झालेल्या विद्याभवन नं. २ च्या विद्यार्थिनी

## अभियांत्रिकी व एस.एस.धामणकर व्यवस्थापन महाविद्यालय, म्हसरूळ, नाशिक

**संचालक : संजय नि. गुंजाळ**

**प्राचार्य : डॉ. एम. व्ही. भालेराव**

### इंडक्शन २०२४ उत्साहात संपन्न

महाविद्यालयात प्रथम वर्ष अभियांत्रिकी शाखेत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ उत्साहात पार पडला. याप्रसंगी विविध भागांतून विद्यार्थी व त्यांचे पालक आवर्जून उपस्थित होते. मेटा फॉर्म लि. या कंपनीचे संचालक श्री. कौस्तुभ मेहता या कार्यक्रमास उपस्थित होते. त्यांनी आपल्या भाषणात विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या विविध पैलूंचा उलगडा केला. निर्मळ यश हे असंख्य आव्हानांचा सामना करत मिळवावे लागते असेही ते म्हणाले. विद्यार्थ्यांनी फक्त नोकरीच्या मागे न पळता मोठी स्वप्न बाळगावी तसेच ती प्रत्यक्षात उतरवण्यासाठी कष्ट केले पाहिजे असेही त्यांनी नमूद केले. आव्हानांचे रूपांतर संधीमध्ये करा, शिक्षणाने माणूस घडला पाहिजे त्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले पाहिजे असेही ते म्हणाले.

कार्यवाह श्री. संजय गुंजाळ यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. आपल्या कर्तव्याचा मार्ग आपण अबाधित ठेवून यशस्वी व्हावे असे ते म्हणाले. याप्रसंगी त्यांनी संस्थेच्या कामगिरीचा मागोवा घेतला व उपस्थितांना भविष्यातील उपक्रमांविषयी माहिती दिली.

प्राचार्य डॉ. एम. व्ही. भालेराव यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. आपली एकाग्रता व सातत्यपूर्वक प्रयत्न हेच यशाचे खरे मार्ग असतात असे ते म्हणाले. त्यांनी आगामी काळात महाविद्यालय स्तरावर जास्तीत जास्त रोजगार उपलब्ध कसे करता येतील यावर भाष्य केले.

पालकांनीही उत्साहाने सहभागी होत पाल्यांनी अभ्यासाबरोबरच इतरही उपक्रमांमध्ये अग्रेसर राहिले पाहिजे अशी अपेक्षा व्यक्त केली.

या कार्यक्रमाप्रसंगी श्रीराम सदाशिव धामणकर वरिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.जी. वाकचौरे व अभियांत्रिकी शाखेचे सर्व विभाग प्रमुख उपस्थित होते.

प्रमुख पाहुण्यांचा परिचय डॉ. ए. आर. रासने यांनी करून दिला. या कार्यक्रमाचे नियोजन प्रा. एस. व्ही. धारणे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. निलेश डी. कुलकर्णी यांनी केले व प्रा. पुनम एम. गोसावी यांनी उपस्थितांचे आभार मानले.

### शिक्षक दिन उत्साहात साजरा

भारताचे दुसरे राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन् यांची जयंती शिक्षक दिन ५ सप्टेंबर २०२४ रोजी साजरा करण्यात येतो. महाविद्यालयामध्ये सदर कार्यक्रमाचे आयोजन, माहिती व तंत्रज्ञान विभागातर्फे करण्यात आले. कार्यक्रमाची सुरूवात सरस्वती प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. याप्रंसगी प्राचार्य डॉ. एम. व्ही. भालेराव, डॉ. एस. जी वाकचौरे तसेच इतर विभागाचे विभाग प्रमुख, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. याप्रसंगी सर्व शिक्षकांना सन्मानचिन्ह देण्यात आले. प्रा. सुहास धरणे यांनी शिक्षकांची कर्तव्ये काय आहेत यावर मार्गदर्शन केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. व्ही. भालेराव यांनी शिक्षकांना नवनवीन तंत्रज्ञान अवगत करून विद्यार्थ्यांना त्याचा लाभ कसा करून देता येईल याविषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी गायन तसेच कविता वाचन केले. आरती पिंगळे यांनी विद्यार्थ्यांना कार्यक्रमाच्या सादरीकरणासाठी मार्गदर्शन केले. माहिती व तंत्रज्ञान विभाग प्रमुख प्रा. सतीश भदाणे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. प्रा. स्मिता ठाकरे यांनी आभार मानले.

### व्हर्टिकल मशिनिंग सेंटर (VMC) प्रशिक्षण अभियांत्रिकी विभागात सुरू

महाविद्यालयात महाराष्ट्र राज्य शासन मान्यताप्राप्त कौशल्य विकास अंतर्गत व्हर्टिकल मशिनिंग सेंटर (VMC) प्रशिक्षण अभियांत्रिकी विभागात सुरू करण्यात आले आहे. अभियांत्रिकी विभागातील विद्यार्थी कु. विशाल जोरे यांनी राज्यस्तरावर दुसरा क्रमांक

मिळवला असून कु. विशाल गुप्ता यांनी महाराष्ट्र राज्यात सुवर्णपदक पटकावून राष्ट्रीय स्तरावर चौथा क्रमांक प्राप्त केला आहे. याशिवाय, राष्ट्रीय स्तरावर पहिला क्रमांक मिळवलेला कु. राजेंद्र बिंदाणी जागतिक स्तरावर १० सप्टेंबर ते १५ सप्टेंबर २०२४ रोजी भारताचे प्रतिनिधित्व करण्यासाठी फ्रान्सच्या लियोन शहरात गेला आहे. त्यासाठी त्यांनी महाविद्यालयाच्या अभियांत्रिकी विभागात विशेष प्रशिक्षण घेतले आहे.

सदर जागतिक दर्जाचे कौशल्य प्रशिक्षण १२ वी उत्तीर्ण विद्यार्थांना देण्यात येत आहे. या जागतिक स्पर्धेत श्री. महेश चालके, हे राष्ट्रीय स्तरावर परीक्षक (ज्युरी) म्हणून सहभागी झाले आहेत. विभाग प्रमुख डॉ. ए. आर. रासने, प्राचार्य डॉ. एम. व्ही. भालेराव, श्री. अशोक शाह, कार्यवाह श्री. संजय गुंजाळ यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

***

## ✻ अभियांत्रिकी व एस.एस.धामणकर व्यवस्थापन महाविद्यालय, म्हसरूळ, नाशिक ✻



इंडक्शन २०२४ प्रसंगी उपस्थितांना मार्गदर्शन करताना मेटा फॉर्म लि. या कंपनीचे संचालक श्री. कौस्तुभ मेहता मंचावर उपस्थित कार्यवाह श्री. एस एन गुंजाळ, प्राचार्य डॉ. एम. व्ही. भालेराव, डॉ. एस. जी. वाघचौरे व विभाग प्रमुख



दि. ५ सप्टेंबर २०२४ रोजी शिक्षक दिनानिमित्त आयोजित कार्यक्रम प्रसंगी उपस्थित प्राचार्य डॉ. एम व्ही. भालेराव, सर्व विभाग प्रमुख, शिक्षक, शिक्षकेतर सेवक व विद्यार्थी




→ विद्यार्थी कु. राजेंद्र बिंदाणी याचा स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करताना कार्यवाह श्री. संजय गुंजाळ, समवेत प्रशिक्षक महेश चाळके आणि मेकॅनिकल विभाग प्रमुख डॉ. अमोल रासने

# कै. माधवराव बळवंत उर्फ काकासाहेब देशमुख विद्यालय, पंचवटी, नाशिक

**संचालक : श्री. अमोल म. जोशी**
**मुख्याध्यापक : श्री. ज्ञानेश्वर निंबेकर**

**रक्षाबंधन**

दि. २४ ऑगस्ट २०२४ रोजी मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर यांचे अध्यक्षतेखाली रक्षाबंधन साजरे करण्यात आले. शिक्षिका श्रीमती सुनंदा ठाकरे यांनी रक्षाबंधन या सणाचे धार्मिक, भौगोलिक महत्त्व सांगून रक्षाबंधन या सणाच्या विविध कथा सांगितल्या. मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर यांनी वर्ग प्रतिनिधींना राखीचे वाटप केले आणि सर्वांनी प्रेमाने सहकार्याने रहावे असे सांगितले. विद्यार्थ्यांनी एकमेकांना राखी बांधली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती अर्चना केकाण यांनी केले. श्री.तुकाराम मंडले यांनी आभार मानले.

**शिक्षणमहर्षी डॉ. ग. श्री. तथा अण्णासाहेब खैर पुण्यतिथी**

दि. २९ ऑगस्ट २०२४ रोजी मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर आणि सर्व शिक्षकवृंदांनी गुरूवर्य कै. डॉ. अण्णासाहेब खैर यांचे प्रतिमेचे पूजन करून अभिवादन केले. मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर यांनी गुरूवर्य डॉ. अण्णासाहेब खैर यांनी संस्था विकासासाठी केलेल्या कार्याची माहिती सांगितली. या कार्यक्रमास मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर, सर्व शिक्षकवृंद आणि विद्यार्थी उपस्थित होते.

**शिक्षकदिन**

दि.५ सप्टेंबर २०२४ रोजी विद्यालयात शिक्षकदिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी श्री. पंकज पवार, श्री. नामदेव चौरे म.न.पा विद्यालय मखमलाबाद, नाशिक, कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर आणि सर्व शिक्षकवृंदांनी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन् यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन केले. विद्यालयातील शिक्षक श्री. गौरव झुरडे यांनी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचे बालपण, शिक्षण आणि राजकीय कार्याविषयी माहिती सांगितली. प्रमुख अतिथी श्री. पंकज पवार यांनी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन् यांचे जीवनातील प्रेरक प्रसंग कथन केले. मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर यांनी सर्व शिक्षकांचा सत्कार करून शिक्षक दिनाच्या शुभेच्छा दिल्या. इ. ९वी व इ. १०वीच्या विद्यार्थ्यांनी अध्यापनाचे कामकाज केले आणि मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चि. भरत दराने इ. ९ वी या विद्यार्थ्याने केले. आभार चि. शुभम खांडवी इ. १० वी या विद्यार्थ्याने मानले.

**श्री. गणेश प्रतिष्ठापना**

विद्यालयात गणेशोत्सव उत्साहत साजरा करण्यात आला. दि. ७ सप्टेंबर २०२४ रोजी श्री. अमोल जोशी यांचे हस्ते श्री. गणेश प्रतिष्ठापना करण्यात आली. या कार्यक्रमप्रसंगी सर्व संस्था कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

दि. १४ सप्टेंबर २०२४ रोजी श्री गणपती अथर्वशीर्ष सहस्त्रावर्तन करण्यात आले. शिक्षिका सौ. तेजश्री जोशी आणि श्रीमती अर्चना केकाण यांनी विद्यार्थ्यांना अथर्वशीर्षाची संथा दिली.

गणेशोत्सवात विद्यालयात विविध स्पर्धा घेण्यात आल्या. स्पर्धांत यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांची नावे पुढील प्रमाणे

**रांगोळी स्पर्धा**

**इयत्ता पाचवी ते सातवी गट**

| क्रमांक | विद्यार्थ्यांचे नाव | इयत्ता |
|---|---|---|
| प्रथम | चि. देवेंद्र सोमनाथ भोये. | सहावी |
| द्वितीय | चि. राहुल होनाजी खंबाईत | सातवी |
| तृतीय | चि. राहुल केशव राउत | पाचवी |

**इयत्ता आठवी ते दहावी गट**

| | | |
|---|---|---|
| प्रथम | चि. मिलिंद कांतीलाल भोये | दहावी |
| द्वितीय | चि. गौरव सोमनाथ चौधरी | आठवी |
| तृतीय | चि. विशाल सुनील राउत | आठवी |

**गीतगायन स्पर्धा**

**इयत्ता पाचवी ते सातवी गट**

| | | |
|---|---|---|
| प्रथम | चि. आदित्य संजय धांडे | सातवी |
| द्वितीय | चि. देवेंद्र सोमनाथ भोये | सहावी |
| तृतीय | चि. नवीनकुमार किरण गायकवाड | पाचवी |

**इयता आठवी ते दहावी गट**

| | | |
|---|---|---|
| प्रथम | चि. शुभम विलास खांडवी | दहावी |
| द्वितीय | चि. गणेश संपत गोडे | आठवी |
| तृतीय | चि. चिराग भारत रावल | नववी |

**श्री गणेश रेखाटन स्पर्धा**

**पाचवी ते आठवी गट**

| | | |
|---|---|---|
| प्रथम | चि. राहुल होनाजी खंबाइत | सातवी |
| द्वितीय | चि. देवेंद्र सोमनाथ भोये | सहावी |
| तृतीय | चि. रोशन जगदीश चौधरी | सहावी |

**आठवी ते दहावी गट**

| | | |
|---|---|---|
| प्रथम | चि. ओम प्रभाकर साळवे | आठवी |
| द्वितीय | चि. साहिल संतोष पाटील | नववी |
| तृतीय | चि. प्रेम नामदेव साबळे | दहावी |

**निबंध स्पर्धा**

**पाचवी ते आठवी गट**

| | | |
|---|---|---|
| प्रथम | चि. मानव सुरेश तुंगार | सातवी |
| द्वितीय | चि. दुर्लभ केवळ जोपळे | सातवी |
| तृतीय | चि. देवेंद्र सोमनाथ भोये | सहावी |

**मोठा गट**

| | | |
|---|---|---|
| प्रथम | चि. ईशांत उत्तम गवळी | दहावी |
| द्वितीय | चि. सागर देवदास ताठे | नववी |

**हिंदी दिन**

दि. १४ सप्टेंबर २०२४ रोजी हिंदी दिनानिमित्त शिक्षिका श्रीमती सविता चव्हाण यांनी हिंदी भाषेचे महत्त्व सांगितले. तसेच हिंदी गीतगायन स्पर्धा घेण्यात आली. इ. ५वी ते ८वी च्या विद्यार्थ्यांनी विविध हिंदी गीते सादर केली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. तेजश्री जोशी यांनी केले. श्री. तुकाराम मंडले यांनी आभार मानले. ***

*** विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, घाटकोपर शाखा, मुंबई ***



निसर्ग मंडळ आयोजित श्रावण महोत्सवास भेट देताना मुख्याध्यापिका श्रीमती योगिनी पोतदार, उपमुख्याध्यापिका श्रीमती ज्योती देसाई, इंग्रजी माध्यमाच्या समन्वयिका श्रीमती सरला नरेंद्रन्, सहा.शिक्षिका श्रीमती नंदिनी साके व श्रीमती पूजा पाटील



दि. २१ ऑगस्ट २०२४ रोजी 'आरोग्य आणि आहार' विषयक व्याख्यान प्रसंगी उपस्थित व्याख्यात्या डॉ. अपर्णा गोविंद यांचे भेटवस्तू देऊन आभार व्यक्त करताना कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे

## हितचिंतक व आश्रयदाते यांच्या मदतीचे वृत्त, पुणे विभाग

**कोषाध्यक्ष – श्री. कृष्णाजी कुलकर्णी**

**दि. १.८.२०२४ ते ३१.८.२०२४**

**पुढील देणगीदारांनी संस्थेला देणगी देऊन सक्रिय सहाय्य केलेले आहे.**
**संस्थेविषयी दर्शवित असलेल्या आत्मीयतेबद्दल आम्ही सर्वांचे आभारी आहोत.**
**(देणगी व्याजाचा विनियोग देणगी प्राप्त झाल्यानंतर पुढील वर्षापासून १५ वर्षांपर्यंत केला जातो.)**

### देणगी रु. १०,००१/- वरील सर्व

●**नाव** - **श्रीमती गीतांजली शशिकांत लिमये, पुणे**
**देणगी** - रु. ७५,०००/-
**दिनांक** - ७.८.२०२४
**निमित्त** - कै. शशिकांत दत्तात्रय लिमये यांचे जयंतीनिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग संस्थेच्या अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयातील गरीब, गरजू व हुशार विद्यार्थ्यास शिष्यवृत्ती देण्यासाठी

●**नाव** - **सौ. अनुराधा कमलाकर गोखले, पुणे**
**देणगी** - रु. ५७,८००/-
**दिनांक** - २६.८.२०२४
**निमित्त** - सदिच्छा देणगी
**विनियोग** - विनियोग विद्यार्थी कु. सुयोग अविनाश बसवंत याची सन २०२२ - २३ दुसऱ्या वर्षाची फी भरणेसाठी

●**नाव** - **श्री. नयन जयंतीलाल शहा, पुणे**
**देणगी** - रु. २८,५००/- **दिनांक**-१८.८.२०२४
**निमित्त** - कै. सौ. विजयालक्ष्मी जयंतीलाल शहा (दि. १८ ऑगस्ट रु. १३,५००/-) कै. दीपक जयंतीलाल शहा (दि. ३० जुलै रु. ५,०००/-) (चैत्र वद्य १२ रु. १०,०००/-) यांचे स्मृतिदिनानिमित्त
**विनियोग** - रु. १३,५००/- देणगी संपूर्ण रक्कम विनियोग लाडूचे मिष्टान्नासह संपूर्ण भोजन, रु. १०,०००/- व्याजविनियोग मिष्टान्न, रु. ५,०००/- व्याजविनियोग अन्नदान


सदाशिव कुलकर्णी

●**नाव** - **सौ. मीरा मिलिंद गडकरी, पुणे**
**देणगी** - रु. २७,०००/-
**दिनांक** - ३१.८.२०२४
**निमित्त** - कै. सदाशिव रामचंद्र कुलकर्णी यांचे स्मृतिदिनानिमित्त (४ नोव्हेंबर)
**विनियोग** - देणगी रु. १५,०००/- व्याजविनियोग शैक्षणिक मदत, रु. १२,०००/- व्याजविनियोग अन्नदान


संजीवनी दांडेकर

●**नाव** - **श्री. दिलीप दिगंबर दांडेकर, पुणे**
**देणगी** - रु. २५,०००/-
**दिनांक** - १२.८.२०२४
**निमित्त** - कै. संजीवनी दिगंबर दांडेकर यांचे स्मृतीदिनानिमित्त (श्रावण वद्य १०)
**विनियोग** - व्याजविनियोग मिष्टान्न

●**नाव** - **श्री. मधुकर विश्वनाथ शिदोरे, पुणे**
**देणगी** - रु. २०,६५०/-
**दिनांक** - १२.८.२०२४
**निमित्त** - सदिच्छा देणगी
**विनियोग** - रु. १५,६५०/- विनियोग मुक्तांगण इंग्लिश स्कूल सदाशिव पेठ शाखा विद्यार्थिनी कु. श्रीजा गणेश जाधव हिची फी भरणेसाठी, उर्वरित रु. ५,०००/- विनियोग संस्था वाढीसाठी

●**नाव** - **सौ. मृदुला गिरीश करंदीकर, ठाणे**


प्रतिभा बिवलकर


विश्वनाथ बिवलकर


भावना करंदीकर


रमेश करंदीकर

**देणगी** - रु. २०,०००/-
**दिनांक** - २६.८.२०२४
**निमित्त** - कै. प्रतिभा विश्वनाथ बिवलकर
कै. विश्वनाथ विष्णु बिवलकर
कै. भावना रमेश करंदीकर
कै. रमेश विष्णु करंदीकर
यांचे स्मृतिदिनानिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

●**नाव** - **श्री. सुबोध श्रीकांत गोडबोले, पुणे**
**देणगी** - रु. १५,०००/-
**दिनांक** - ७.८.२०२४
**निमित्त** - कै. श्रीकांत जगन्नाथ गोडबोले यांचे स्मृतिदिनानिमित्त (९ ऑगस्ट)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग गुलाबजामचे मिष्टान्नासह संपूर्ण भोजन

●**नाव** - **श्री. विश्वनाथ रघुनाथ नाईक, पुणे**
**देणगी** - रु. १५,०००/-
**दिनांक** - ३०.८.२०२४
**निमित्त** - कै. शरयु विश्वनाथ नाईक यांचे स्मृतिदिनानिमित्त (७ सप्टेंबर)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग उकडीचे मोदकासह संपूर्ण भोजन

●**नाव** - **श्री. मनिष सदाशिव कुलकर्णी, पुणे**
**देणगी** - रु. १३,५००/-
**दिनांक** - २२.८.२०२४
**निमित्त** - कै. श्रीमती सविता सदाशिव कुलकर्णी यांचे स्मृतिदिनानिमित्त (२५ ऑगस्ट)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग जिलेबीचे मिष्टान्नासह संपूर्ण भोजन

## देणगी रु. ५,००१/- ते रु. १०,०००/-


ऋषिकेश वढवेकर

●**नाव** - **श्रीमती मंजुषा ऋषिकेश वढवेकर, मुंबई**
**देणगी** - रु. १०,०००/-
**दिनांक** - २.८.२०२४
**निमित्त** - कै. स. पां. देशपांडे, कै. ऋषिकेश गोविंद वढवेकर यांचे स्मृतिदिनानिमित्त (२२ ऑगस्ट)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग मिष्टान्नासह संपूर्ण भोजन

●**नाव** - **डॉ. श्रीमती लीला बाळकृष्ण कळमकर आपटे, मुंबई**



राधाबाई आपटे



नारायण आपटे

**देणगी** - रु. ५,००२/-
**दिनांक** - ३.८.२०२४
**निमित्त** - कै. सौ. राधाबाई नारायण आपटे, कै. नारायण विनायक आपटे यांचे स्मृतिदिनानिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग मिष्टान्न

●**नाव** - **श्रीमती प्रभा माधव घारपुरे, पुणे**
**देणगी** - रु. १०,०००/-
**दिनांक** - १४.८.२०२४
**निमित्त** - कै. माधव घारपुरे यांचे स्मृतिदिनानिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान



गजानन संत

●**नाव** - **ॲड. ज्ञानराज गजानन संत (मा. वि.), पुणे**
**देणगी** - रु. ५,००१/-
**दिनांक** - १६.८.२०२४
**निमित्त** - कै. गजानन रंगनाथ संत (मा. वि.) यांचे स्मृतिदिनानिमित्त (श्रावण शुध्द १५)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग मिष्टान्न (जिलेबी व नारळीभात) देण्यासाठी



शशिकुमार गोरे

●**नाव** - **श्री. हर्षल शशिकुमार गोरे, पुणे**
**देणगी** - रु. १०,०००/-
**दिनांक** - २२.८.२०२४
**निमित्त** - कै. शशिकुमार भास्कर गोरे यांचे स्मृतिदिनानिमित्त (३० जून)
**विनियोग** - पूर्वीच्या देणगी रकमेत समाविष्ट करुन येणाऱ्या व्याजाचा विनियोग अन्नदान

●**नाव** - **श्री. एस. डी. जोशी, पुणे**
**देणगी** - रु. १०,०००/-
**दिनांक** - २६.८.२०२४
**निमित्त** - सदिच्छा देणगी
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग संस्थावाढीसाठी

●**नाव** - **श्री. जयंत कृष्णराव मजली, मुंबई**
**देणगी** - रु. १०,०००/-
**दिनांक** - २७.८.२०२४
**निमित्त** - कै. अचलाबाई कृष्णराव मजली कै. कृष्णराव नरसिंह मजली यांचे स्मृतिदिनानिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण विनियोग अन्नदान

**देणगी रु. ४,००१/- ते रु. ५,०००/-**

●**नाव** - **श्री. मकरंद गोपाळ निमोणकर, पुणे**
**देणगी** - रु. ५,०००/-
**दिनांक** - १.८.२०२४
**निमित्त** - कै. कुमुद प्रभाकर नगरकर यांचे स्मृतिदिनानिमित्त (श्रावण शुध्द ५)
**विनियोग** - देणगी व्याजविनियोग अन्नदान

●**नाव** - **श्री. महेश बाळकृष्ण देखणे, पुणे**
**देणगी** - रु. ५,०००/-
**दिनांक** - १.८.२०२४
**निमित्त** - कै. बाळकृष्ण केशव देखणे (मा. वि.) यांचे स्मृतिदिनानिमित्त (८ डिसेंबर)
**विनियोग** - देणगी व्याजविनियोग अन्नदान

●**नाव** - **श्री. येशवंत रामकृष्ण खेर, पुणे**
**देणगी** - रु. ५,०००/-
**दिनांक** - २.८.२०२४
**निमित्त** - कै. प्रभाकर यशवंत टोळे यांचे स्मृतिदिनानिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

●**नाव** - **श्री. सुरेश घनःशाम गोखले, (मा. वि.) पुणे**
**देणगी** - रु. ५,०००/-
**दिनांक** - ५.८.२०२४
**निमित्त** - माजी विद्यार्थी ऋणविमोचनार्थ


यशवंत साने

●**नाव** - **सौ. राजश्री अविनाश बेलसरे, पुणे**
**देणगी** - रु. ५,०००/-
**दिनांक** - ९.८.२०२४
**निमित्त** - वडील कै. यशवंत गोपाळ साने यांचे स्मृतिदिनानिमित्त (१३ ऑगस्ट)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

●**नाव** - **श्री. मिलिंद श्रीपाद रास्ते, पुणे**
**देणगी** - रु. ५,०००/-
**दिनांक** - १६.८.२०२४
**निमित्त** - कै. श्रीपाद विश्वनाथ रास्ते यांचे स्मृतिदिनानिमित्त (१६ ऑगस्ट)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

●**नाव** - **श्रीमती आशा श्रीकांत फाटक, पुणे**
**देणगी** - रु. ५,०००/-
**दिनांक** - २२.८.२०२४
**निमित्त** - कै. श्रीकांत दत्तात्रय फाटक यांचे स्मृतिदिनानिमित्त (२२ ऑगस्ट)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

●**नाव** - **श्री. मुकूल नरसिंह मोडक, पुणे**
**देणगी** - रु. ५,०००/-
**दिनांक** - ३१.८.२०२४
**निमित्त** - कै. नरसिंह दिनकर मोडक यांचे स्मृतिदिनानिमित्त (३१ ऑगस्ट)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनिोग अन्नदान

**देणगी रु. ३,००१/- ते रु. ४,०००/-**

●**नाव** - **मा. विश्वस्त श्री. वासुदेव व श्रीमती ज्योत्सना धर्मा विश्वस्त देसाई द्वारा महाराष्ट्र एक्झिक्युटर ॲण्ड ट्रस्टी क. प्रा. लि., ठाणे**
**देणगी** - रु. ३,२००/-
**दिनांक** - ५.८.२०२४
**निमित्त** - कै. श्री. वासुदेव व कै. श्रीमती ज्योत्सना देसाई यांचे स्मृतिदिनानिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

●**नाव** - **श्री. श्रीकांत नारायण तोडकरी, पुणे**
**देणगी** - रु. ३,५००/-
**दिनांक** - ६.८.२०२४
**निमित्त** - कै. नारायण तुकाराम तोडकरी यांचे स्मृतिदिनानिमित्त (९ ऑगस्ट)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अल्पोपहार

●**नाव** - **श्री. गिरीश श्रीधर लिमये, पुणे**
**देणगी** - रु. ३,५००/-
**दिनांक** - १७.८.२०२४
**निमित्त** - कै. वसुंधरा श्रीधर लिमये यांचे स्मृतिदिनानिमित्त (श्रावण शुध्द १४)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग मिष्टान्न

**देणगी रु. २,००१/- ते रु. ३,०००/-**

●**नाव** - **श्री. अशोक पांडुरंग भावे, पुणे**
**देणगी** - रु. ३,०००/-
**दिनांक** - १२.८.२०२४
**निमित्त** - कै. पांडुरंग विष्णु भावे यांचे स्मृतिदिनानिमित्त (२२ ऑगस्ट)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

●**नाव** - **श्री. भालचंद्र मारुतराव देशपांडे, पुणे**
**देणगी** - रु. २,५००/-
**दिनांक** - १६.८.२०२४
**निमित्त** - कै. मारुतराव महादेव देशपांडे यांचे स्मृतिदिनानिमित्त (३ सप्टेंबर)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अल्पोपहार

●**नाव** - **श्री. प्रदीप मधुकर जोशी, पुणे**
**देणगी** - रु. २,५००/-
**दिनांक** - २०.८.२०२४
**निमित्त** - कै. सरला मधुकर जोशी यांचे स्मृतिदिनानिमित्त (२६ ऑगस्ट)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग मिष्टान्न

●**नाव** - **श्री. राहुल विद्याधर चिवटे, पुणे**
**देणगी** - रु. २,५०१/-
**दिनांक** - २०.८.२०२४
**निमित्त** - श्रावणी शनिवारनिमित्त सदिच्छा देणगी
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग मिष्टान्न

●**नाव** - **श्री. मकरंद मधुकर मोघे, पुणे**
**देणगी** - रु. २,१००/-
**दिनांक** - २४.८.२०२४
**निमित्त** - कै. श्रीमती आर्या मधुकर मोघे यांचे स्मृतिदिनानिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग मिष्टान्न

●**नाव** - **श्री. रूद्रा मलाली, पुणे**
**देणगी** - रु. २,५००/-
**दिनांक** - २६.८.२०२४
**निमित्त** - कै. किरण श्रीपाद मलाली यांचे स्मृतिदिनानिमित्त (२६ ऑगस्ट)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग मिष्टान्न

●**नाव** - **श्री. प्रमोद गोपाळ नातू, पुणे**
**देणगी** - रु. २,५००/-
**दिनांक** - २७.८.२०२४ व २९.८.२०२४
**निमित्त** - कै. शोभना गोपाळ नातू यांचे जयंती निमित्त (रु.२,०००/-) व कै. सौ. सुनंदा प्रमोद नातू यांचे स्मृतिदिनानिमित्त (रु. ५००/-)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

●**नाव** - **श्री. मंदार मुकुंद मुतालिक, पुणे**
**देणगी** - रु. २,१००/-
**दिनांक** - ३१.८.२०२४
**निमित्त** - कै. सई मंदार मुतालिक यांचे स्मृतिदिनानिमित्त (३१ ऑगस्ट)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग मिष्टान्न

**देणगी रु. १,००१/- ते रु. २,०००/-**

**●नाव - श्री. अनिल मधुकर गोगटे, पुणे**
**देणगी** - रु. १,५००/-
**दिनांक** - ६.८.२०२४
**निमित्त** - कै. मधुकर रामकृष्ण गोगटे यांचे स्मृतिदिनानिमित्त (९ ऑगस्ट)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

**●नाव - १९४८ मॅट्रिक तुकडी शिष्यवृत्ती निधी पुणे विद्यार्थी गृह, पुणे**
**देणगी** - रु. १,१२०/-
**दिनांक** - ७.८.२०२४
**निमित्त** - सदिच्छा देणगी
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग संस्थावाढीसाठी

**●नाव - श्री. जयंत वसंत देवधर, पुणे**
**देणगी** - रु. २,०००/-
**दिनांक** - १०.८.२०२४
**निमित्त** - कै. वसंत नरहर देवधर व कै. श्रीमती वासंती वसंत देवधर यांचे स्मृतिदिनानिमित्त (१० ऑगस्ट)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

**●नाव - श्री. सारंग द्वारकानाथ चावरेकर, पुणे**
**देणगी** - रु. १,००१/-
**दिनांक** - १३.८.२०२४
**निमित्त** - कै. द्वारकानाथ मनोहर चावरेकर यांचे स्मृतिदिनानिमित्त (१३ ऑगस्ट)
**विनियोग** - देणगी व्याज विनियोग अन्नदान

**●नाव - श्री. हेमंत बळवंत सैतवाडकर, पुणे**



बळवंत आणि उर्मिला सैतवाडकर

**देणगी** - रु. २,०००/-
**दिनांक** - २१.८.२०२४
**निमित्त** - कै. बळवंत वासुदेव सैतवाडकर, कै. उर्मिला बळवंत सैतवाडकर आणि कै. संजीव बळवंत सैतवाडकर यांचे स्मृतिदिनानिमित्त (आषाढ वद्य ३०)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग गरीब, गरजू, ब्राह्मण विद्यार्थ्यांचे शैक्षणिक मदतीसाठी

**●नाव - श्री. मोहन महादेव पाटणकर, पुणे**
**देणगी** - रु. २,०००/-
**दिनांक** - २६.८.२०२४
**निमित्त** - कै. महादेव हरी पाटणकर यांचे स्मृतिदिनानिमित्त (२९ सप्टेंबर)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान



विद्या सप्तर्षी

**●नाव - श्री. विजयकुमार नारायण सप्तर्षी, (माजी सेवक),पुणे**
**देणगी** - रु. १,५००/-
**दिनांक** - २९.८.२०२४
**निमित्त** - कै. सौ. विद्या विजयकुमार सप्तर्षी यांचे स्मृतिदिनानिमित्त (भाद्रपद शुध्द ६)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

●**नाव** - **श्री. श्रीकांत दामोदर शिखरे, पुणे**
**देणगी** - रु. १,५०१/-
**दिनांक** - ३१.८.२०२४
**निमित्त** - कै. दामोदर नरहर शिखरे यांचे स्मृतिदिनानिमित्त (२ सप्टेंबर) आणि पितृपक्षानिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

**देणगी रु. ५०१/- ते रु. १,०००/-**

●**नाव** - **श्री. दीपक एकनाथ नेलेकर, पुणे**
**देणगी** - रु. १,०००/-
**दिनांक** - ५.८.२०२४
**निमित्त** - कै. श्रीमती लीला एकनाथ नेलेकर यांचे स्मृतिदिनानिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

●**नाव** - **श्री. कमलाकर अनंत जाईल, पुणे**
**देणगी** - रु. १,०००/-
**दिनांक** - ५.८.२०२४
**निमित्त** - कै. अजित कमलाकर जाईल यांचे स्मृतिदिनानिमित्त (६ ऑगस्ट)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

●**नाव** - **सौ. मीना बिलोल खळदकर, पुणे**
**देणगी** - रु. १,०००/-
**दिनांक** - १२.८.२०२४
**निमित्त** - कै. श्रीमती वंदना गजानन खळदकर (११ ऑक्टोबर)
कै. गजानन शंकर खळदकर (८ सप्टेंबर)
**विनियोग** - देणगी संपूर्ण विनियोग अन्नदान

●**नाव** - **वृषाली विवेक जोशी, पुणे**
**देणगी** - रु. ५०१/-
**दिनांक** - १६.८.२०२४
**निमित्त** - श्रावणानिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

●**नाव** - **श्रीमती स्वाती अनिल जोशी, पुणे**
**देणगी** - रु. १,०००/-
**दिनांक** - २२.८.२०२४
**निमित्त** - कै. अनिल भालचंद्र जोशी यांचे स्मृतिदिनानिमित्त (२७ ऑगस्ट)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

●**नाव** - **श्री. संजय विष्णु वझे, पुणे**
**देणगी** - रु. १,०००/-
**दिनांक** - २७.८.२०२४
**निमित्त** - सदिच्छा देणगी
**विनियोग** - देणगी संपूर्ण विनियोग अन्नदान

●**नाव** - **श्रीमती अमृता अरुण कुलकर्णी, पुणे**
**देणगी** - रु. १,०००/-
**दिनांक** - ३०.८.२०२४
**निमित्त** - कै. अरुण दत्तात्रय कुलकर्णी
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग शैक्षणिक मदत

**देणगी रु. ५००/- खालील सर्व**

●**नाव** - **श्री. काशिनाथ दत्तात्रय सरदेशमुख, पुणे**
**देणगी** - रु. ५००/-
**दिनांक** - १७.८.२०२४
**निमित्त** - कै. दत्तात्रय पांडुरंग सरदेशमुख (१९ ऑगस्ट)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

●**नाव** - **मा. विश्वस्त विठ्ठल रुक्मिणी भट पब्लिक ट्रस्ट, पुणे**
**देणगी** - रु. १०१/-
**दिनांक** - ५.८.२०२४
**निमित्त** - कै. विठ्ठल भट यांचे स्मृतिदिनानिमित्त (२८ ऑगस्ट)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

**वाढदिवसानिमित्त देण्यात आलेल्या देणग्या**

●**नाव** - **श्री. नयन जयंतीलाल शहा, पुणे**
**देणगी** - रु. १०,०००/-
**दिनांक** - १९.८.२०२४
**निमित्त** - स्वतःच्या वाढदिवसानिमित्त (भाद्रपद शुध्द ६)
**विनियोग** - देणगी व्याजविनियोग मिष्टान्न

●**नाव** - **श्री. प्रसाद अशोक प्रभुणे, पुणे**
**देणगी** - रु. ५८१/-
**दिनांक** - १३.८.२०२४
**निमित्त** - श्रीमती नलिनी अशोक प्रभुणे यांच्या ८१ व्या वाढदिवसानिमित्त (१३ ऑगस्ट)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

**वस्तुरूप देणगी अंदाजे मूल्य रु.**

१) **श्री. केतन नागेश दास, जोगेश्वरी**
प्रिंटिंग कॉलेज ग्रंथालयासाठी २९ पुस्तके रु. २,५०१/-

२) **श्री. सोमनाथ अर्जुन चोरगे, राठवडे**
चि. हर्षद सोमनाथ चोरगे याचे वाढदिवसानिमित्त, ढोकळा १० कि., रु. २,५००/-

३) **श्री. योगेश मेहेंदळे, पुणे**
सदिच्छा देणगी, गहू २५ कि. रु. १,११०/-

४) **श्री. दीपक दत्तात्रय देशपांडे, पुणे**
वह्या नवीन २०० पानी २ डझन,
फ्लेअर मुव्ह जेलपेन २४ नग, रु. १,०००/-

५) **श्रीमती इरावती पुरुषोत्तम साठे, पुणे**
महाभारत व दासबोध पुस्तके रु. ३५०/- ❊❊

## अभिनंदनीय

पुणे विद्यार्थी गृह माजी विद्यार्थी मंडळ, नाशिकचे अध्यक्ष डॉ. एकनाथ कुलकर्णी यांना 'इंटरनॅशनल आयुर्वेद असोसिएशन' या संस्थेतर्फे दिल्या जाणाऱ्या 'डॉ. पांडुरंग हरी कुलकर्णी आंतरराष्ट्रीय उत्तम संपादक पुरस्कार' दि. ११ ऑगस्ट २०२४ रोजी देऊन सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार त्यांना राष्ट्रीय शिक्षण मंडळाचे अध्यक्ष डॉ. दिलीप पुराणिक यांच्या हस्ते पुणे येथील आंतरराष्ट्रीय आयुर्वेद संशोधन परिषदेत देण्यात आला. डॉ. एकनाथ कुलकर्णी 'आयुर्वेद पत्रिका' या ७८ वर्षे अखंडितपणे प्रकाशित होणाऱ्या मासिकाचे संपादक आहेत. तसेच ते दोन आंतरराष्ट्रीय नियतकालिकांच्या संपादक मंडळाचे सदस्य आहेत.




संस्थेचे जेष्ठ मा. वि. डॉ. एकनाथ कुलकर्णी यांचे संस्थेतर्फे हार्दिक अभिनंदन आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा ! ❊❊

## ❊ विद्याप्रशाला हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, तळेगांव अंजनेरी शाखा, नाशिक ❊



दि. ५ सप्टेंबर २०२४ शिक्षक दिनी कै. पितांबर बापू मिसाळ यांच्या पुण्यस्मरणार्थ दिला जाणारा 'सेवा जेष्ठ शिक्षक पुरस्कार' ज्येष्ठ शिक्षक श्री. सुकदेव निंबेकर यांना प्रदान करताना संचालक श्री. अमोल जोशी, समवेत मुख्याध्यापक श्री. शरद कोठावदे



शिक्षक लोकशाही आघाडी व माध्यमिक शिक्षक संघ, पुणे शहर यांच्या वतीने देण्यात येणारा 'गुणवंत शिक्षक पुरस्कार २०२४' स्वीकारताना क्रीडा शिक्षक श्री. संजय गीते

## ❊ मुक्तांगण इंग्लिश स्कूल सदाशिव पेठ शाखा, पुणे ३० ❊



गुरुवार दि. २९ ऑगस्ट २०२४ रोजी 'लेडी गावसकर' शोभा पंडित यांचा सत्कार करताना संचालक श्री. रमेश कुलकर्णी, समवेत कोषाध्यक्ष श्री. कृष्णाजी कुलकर्णी आणि संचालक डॉ. राजेंद्र कांबळे



←

## ❊ म्हसरूळ शाखा, नाशिक ❊

दि. १५ ऑगस्ट २०२४ रोजी राष्ट्रध्वजास सलामी देताना कार्यवाह श्री. संजय गुंजाळ, विविध विभागांचे प्राचार्य आणि मुख्याध्यापिका

Postal Reg. No. PCW / 168 / 2023-2025, Office of Posting *Pune PSO *GPO 411 001*
[Publication Date 13.10.2024 Posting Date 15.10.2024]
SAMACHAR - Registered RNI No. 14546 / 1957. Decl. No. SDO / PUNE / SR / 74 / 2016
**License No. WPP - 56/2023-2025**

## ✻ आश्रम वसतीगृह, पुणे ३० ✻



समर्थ प्रतिष्ठानच्या २५ व्या वर्धापनदिनानिमित्त त्यांनी संस्थेस रु. २५,०००/- ची देणगी दिली. श्री. पुनीत बालन आणि निवृत्त एअर मार्शल श्री. भूषण गोखले यांच्या हस्ते देणगीचा धनादेश स्वीकारताना संचालक श्री. सुनिल रेडेकर



दि. २ ऑक्टोबर २०२४ रोजी समर्थ प्रतिष्ठानच्या २५ व्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमामध्ये १० आश्रमस्थ विद्यार्थ्यांना दत्तक घेऊन त्यांचा संपूर्ण शैक्षणिक खर्च इंद्राणी बालन आणि समर्थ प्रतिष्ठान यांच्या वतीने करण्यात येणार आहे, या प्रसंगी उपस्थित मान्यवर आणि संबंधित विद्यार्थी.

♦ पुणे विद्यार्थी गृह ♦
▣ पुणे शाखा - (०२०) २४४७०९२७, २४४७०५७३, २४४७९०५८
▣ मुंबई शाखा : (०२२) २५०६२३२२ फॅक्स : (०२२) २५०६४९३५ ▣ नवी मुंबई (नेरुळ) (०२२) २७७२३४१८
▣ नाशिक शाखा : (०२५३) २५११३०६ ▣ म्हसरुळ: (०२५३) २५३४२९१ ▣ तळेगाव अंजनेरी शाखा: (०२५९४)२२२२२७
कृपया आपल्या प्रतिक्रिया pvgsamachar@gmail.com या ई मेल वर नोंदवाव्यात.

**This monthly Samachar is printed on behalf of Pune Vidyarthi Griha by Printer and Publisher Mr. Subhash Mallappa Jirge at Maharashtra Mudranshala Chhapkhana, 1786, Sadashiv Peth, Pune 411030 and Published at Pune Vidyarthi Griha, 1786, Sadashiv Peth, Pune 411030.**
**Editor : Mr. Rajendra Vitthal Borhade**

समाचार हे मासिक पुणे विद्यार्थी गृह संस्थेकरिता मुद्रक, प्रकाशक श्री. सुभाष मल्लाप्पा जिर्गे यांनी महाराष्ट्र मुद्रणशाळा छापखाना, १७८६ सदाशिव पेठ, पुणे ४११०३० येथे छापून पुणे विद्यार्थी गृह, १७८६ सदाशिव पेठ, पुणे ४११०३० येथे प्रसिद्ध केले.
संपादक श्री. राजेंद्र विठ्ठल बोऱ्हाडे